दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के



# जिजांचे अपघाती निधन!

शांत, संयमी, प्रेमळ म्हणून आर.टी देशमुख यांची ओळख | पाण्याचा अंदाज आला नाही, गाडी चार वेळा पलटी | परळीत २८ तारखेला होणार जिजांचा अंत्यविधी | आर.टी देशमुख यांच्या निधनाने पोकळी निर्माण

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक आणि भाजपचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचं आज अपघाती निधन झालं. अपघात नेमका कसा झाला? याबाबत वाहन चालकाने माहिती दिली आहे. लातूर-सोलापूर महामार्गावर असलेल्या औसा तालुक्यातील बेलकुंड येथे रोडवर पाणी साचलेले होते, ते पाणी उडून काचेवर आले. यामुळे चालकास समोरचे काही दिसले नाही. अचानक ब्रेक लावला. यामुळे गाडी घसरत जाऊन पलटी झाली. गाडीने चार पलट्या खाल्ल्या. रस्त्यावरील पाण्याचा अंदाज न आल्याने हा अपघात घडला, अशी माहिती चालकाने दिली. या अपघातात माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांना गंभीर दुखापत झाली होती. त्यांना पुढील उपचारासाठी लातूरला नेले जात होते. पण या दरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. आर. टी. देशमुख यांना पुढील उपचारासाठी लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.बीड जिल्ह्यातील माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या गाडीला लातूर-तुळजापूर रस्त्यावरील बेलकुंड येथे अपघात झाला. या अपघातात माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू झाला आहे. त्यांना तात्काळ लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आल होते. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला.

## कसा झाला अपघात?

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील बेलकुंड उड्डाणपूलावरून जात असताना गाडी स्लिप होऊन सुरक्षा कठडा तोडून चार वेळेस पलटी झाली. त्यात माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू झाला. या घटनेत गाडीत असलेला वाहनचालक मात्र बचावला आहे. त्याच्या हाताला आणि डोक्याला मार लागला आहे. महामार्गावरील रस्त्यावर पावसाचे पाणी साचलं होतं. वेगात असलेल्या गाडीच्या समोरील काचेवर पावसाचे पाणी आले. त्यामुळे वाहन चालकास अंदाज लागला नाही. वेगात असलेल्या गाडीला ब्रेक लावला. यात गाडी स्लीप झाली. गाडीने चार पलटी खाल्ल्या.

## आधी मुंडे साहेब नंतर मेटे साहेब आणि आता जिजा



बीड जिल्ह्यातील तीन मोठ्या नेत्यांचे रस्ते अपघातात अकाली निधन झाले. आधी स्व. गोपीनाथराव मुंडेसाहेब, त्यानंतर विनायकराव मेटे साहेब आणि आता आर.टी. जिजा यांचे रस्ते अपघातातील निधन जिल्हावासियांच्या मनाला चटका लावून गेले आहे. आर. टी. जिजा यांनी सीट बेल्ट लावला होता की नाही ? हे अजुन समोर आले नाही, मात्र त्यांचा अंगरक्षक आणि ड्रायव्हर जखमी झाले असून ते धोक्या बाहेर आहेत.

## मार्गदर्शक नेतृत्वास मुकलो: धनंजय मुंडे



आर. टी. जिजा देशमुख यांच्या निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास आपण मुकलो आहोत. त्यांच्या अकाली अपघाती निधनाने बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.मुंडे आणि देशमुख कुटुंबाचे पिढीजात नाते असून, आज त्या नात्यातील आणखी एक छाया आम्हाला पोरके करून गेली, अशी भावनिक प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

## जिजांच्या जाण्याने पोकळी निर्माण



आर टी जिजा यांच्या बातमीने मला धक्काच बसला. ही घटना माझ्यासाठी खूपच दुःखद आणि वेदनादायी आहे. जिजा आमचे ज्येष्ठ सहकारी होते. लोकनेते मुंडे साहेबांचे ते निष्ठावान सहकारी होते, त्यांच्या जाण्याने मला खूप वेदना होत आहेत अशा शब्दांत ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या.

## जिजांचा परिचय

माजलगावचे माजी आ. आर टी देशमुख यांचा जन्म परळी तालुक्यातील मोहा या गावात एका गरीब कुटुंबात झाला. लहानपणी त्यांनी शेतमजूर म्हणून काम केले. कालांतराने यांचा संपर्क लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे सोबत आल्यानंतर ते भाजपचे सक्रिय कार्यकर्ते झाले त्याबरोबरच त्यांनी ठेकेदारीच्या व्यवसायात जम बसवला व ते राज्यातील मोठे ठेकेदार या सोबतच त्यांनी अनेक व्यवसायांची उभारणी केली. सन २००९ त्यांनी पहिल्यांदा माजलगाव विधानसभा मतदारसंघाची भाजप शिवसेना महायुतीच्या वतीने निवडणूक लढवली त्यामध्ये त्यांचा ७९०९ मतांनी पराभव झाला होता त्यानंतर त्यांनी खचून न जाता २०१४ साली पुन्हा निवडणूक लढवली व ते माजलगाव मतदारसंघाचे भाजप शिवसेना महायुतीचे आमदार म्हणून आर टी देशमुख हे राष्ट्रवादीचे प्रकाश सोळंके यांचा ३७ हजार मतांनी पराभव करून विजय झाले होते. एक लोकप्रिय आमदार म्हणून त्यांची मतदारसंघात ख्याती होती गोरगरीब सर्वसामान्य जनतेत मिसळून त्यांचे कामे करण्याची हातोटी असल्याने ते प्रचंड लोकप्रिय झाले होते. २०१९ साली पक्षाने त्यांना त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे तिकीट नाकारले होते मात्र त्यांची लोकप्रियता व संपर्क कायम होता. मागील पाच वर्षापासून आर टी देशमुख यांनी परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील लिंबा येथे योगेश्वरी शुगर या साखर कारखान्याचे उभारणी करून त्यामध्ये लक्ष घातले होते, मात्र मतदार संघात संपर्क कायम होता.

# हिंदी-इंग्रजीसोबत मराठी बंधनकारक

## निर्णय:त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करण्याचे आदेश

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत हिंदी, इंग्रजीसह मराठीचा वापर करणे बंधनकारक असल्याचा आदेश राज्य सरकारने काढला आहे. या संबंधी सरकारने परिपत्रक जारी केले आहे. शासनाच्या या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिका-यांकडे असणार आहे. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील सर्व कार्यालयात मराठीचा वापर करण्यात यावा. त्यासंबंधी संबंधित कार्यालयांनी दर्शनी ठिकाणी सूचनाफलकावर तसे स्वयंघोषणापत्र लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.




मराठीचा वापर होत नसल्याच्या तक्रारी राज्यातील राष्ट्रीय बँका, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनो-रेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम इत्यादी सेवा पुरविणारी कार्यालये, केंद्र शासनाची अन्य कार्यालये आदी ठिकाणी त्रिभाषा सूत्रानुसार कार्यवाही होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने हा आदेश काढला. केंद्र आणि राज्य सरकारच्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यात येतो किंवा कसे याबाबत पडताळणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिका-यांवर असेल. तसेच याबाबतचे स्वयंघोषणापत्र संबंधित कार्यालयाकडून विहित नमुन्यात जिल्हाधिकारी घेणार आहेत. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर पालकमंत्री किंवा लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या पान २ वर

## अनेक बँकांमध्ये मराठीचा वापर नाही

राज्यातील अनेक बँकांमध्ये, खासकरून मुंबई, ठाणे परिसरातील सार्वजनिक बँकामध्ये मराठीचा वापर केला जात नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यावरून मनसेने आंदोलनही केलं. मुंबई आणि ठाण्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये ग्राहकांना ही अडचण येत असल्याचं दिसून येतंय. आता सरकारच्या नव्या आदेशानुसार या बँकांमध्येही मराठीचा वापर करणे बंधनकारक असणार आहे. राज्य सरकारच्या या नियमानुसार, केंद्र सरकारचे जी कार्यालये महाराष्ट्रात आहेत त्या ठिकाणीही मराठीचा वापर करणे बंधनकारक असेल. रेल्वे आणि मेट्रोच्या ठिकाणी मराठीचा वापर करणे बंधनकारक असेल.

# नगराध्यक्षांचे स्वतःला गाडून घेत आंदोलन!

## आक्रमक:मागील तीन वर्षातील कामात मोठा भ्रष्टाचार

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या भ्रष्ट कारभाराचा विरोध करत परळी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी चक्क स्वतःला गाडून घेण्याच्या अनोख्या आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. प्रशासन आणि नगरपालिकेच्या मनमानी कारभाराचा निषेध करण्यासाठी त्यांनी हे धाडसी पाऊल उचलले.

सरस्वती नदीच्या विकासासाठी आलेल्या ५० कोटींच्या निधीचा नगरपालिकेकडून गैरवापर होत आहे, असा थेट आरोप देशमुख यांनी केला. गंगासागर नगर, खुदबे नगर, सिद्धेश्वर नगर, बरकत नगर यांसारख्या परिसरात दरवर्षी पावसाळ्यात घरात पाणी शिरते. नागरिकांना पंधरा-पंधरा दिवस पाण्यातच जगावं लागतं. पण यावर ठोस उपाययोजना न करता केवळ डीपीआर तयार करून निधी वाया घालवला जातो, असं ते म्हणाले.त्यांनी यावेळी सांगितलं की, कोणालाही विश्वासात न घेता ५० कोटींचा डीपीआर तयार करून मनपाने मनपसंत गुत्तेदारांना काम दिलं. हाच गुत्तेदार याआधी १५० कोटींच्या अंतर्गत भुयारी गटार योजना फस्त केली. आता त्यालाच पुन्हा संधी देऊन परळीच्या जनतेची फसवणूक केली जात आहे.




देशमुख यांच्या म्हणण्यानुसार, गेली तीन वर्षे सरस्वती नदी परिसरातील नागरिकांचे प्रश्न तेच आहेत, पण निधीचा अपव्ययच सुरू आहे.

### आता बोलण्याची नाही, लढण्याची वेळ आहे!

असा निर्धार करत त्यांनी आंदोलन सुरू केले असून, चांगल्या गुत्तेदारामार्फत पारदर्शकपणे काम व्हावे, यासाठी संघर्ष सुरू ठेवणार असल्याचेही स्पष्ट केले.

मनमानी करणारे अधिकारी आणि ठेकेदारांचे साटेलोटे हेच परळीच्या विकासाला अडथळा ठरत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# गढी जवळ भीषण अपघात; ६ जणांचा मृत्यू

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: गेवराई तालुक्यातील गढी परिसरात रविवारी रात्री उशिरा एक भीषण अपघात घडला असून या दुर्घटनेत सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी येथील कारखान्यासमोर दीपक आतकरे यांच्या मुलाचा एक्स यू व्ही ५०० वाहन डिव्हायडरवर आदळून अपघात झाला. या अपघातात कुणीही जखमी झाले नव्हते.



मात्र, डिव्हायडरमध्ये अडकलेली गाडी बाहेर काढण्यासाठी दीपक आतकरे आणि त्यांचे काही सहकारी घटनास्थळी आले असता, अचानक भरधाव वेगात आलेल्या आयशर ट्रकने त्यांना जबर धडक दिली.या भीषण धडकेत बाळू आतकरे, पान २ वर

# बीडमध्ये रिपाइंची भारत झिंदाबाद यात्रा

## पप्पू कागदे:सहभागी होण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणी उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैन्याने अतुलनीय



शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाइंच्या वतीने सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात पान २ वर

एकजूट | मंडळधिकाऱ्यांची उपोषण स्थळी भेट

# तांदळा उपोषणात शेतकऱ्यांचा सहभाग

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई: तालुक्यातील तांदळा येथे जायकवाडीचे पाणी सोडावे यासह इतर अनेक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उपोषण सुरू आहे. या उपोषणास गावोगावचे शेतकरी भेट देऊन सहभाग घेत आहेत. सोमवारी उपोषण करते अजय पाटील साळुंखे यांची प्राथमिक आरोग्य केंद्र मादळहोमी येथील डॉक्टरांनी भेट घेऊन तपासणी केली. तर मंडळधिकारी डि.डि. शेंबडे व तलाठी नामदेव पाखरे यांनी उपोषणस्थळी भेट दिली.



बीड जिल्ह्यातील शिरूर गेवराई बीड माजलगाव वडवणी या तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतीला बारमाही पाणी मिळत नाही. जायकवाडी धरण अत्यंत जवळ असूनही अद्यापही या धरणाचे पाणी या वंचित भागाला मिळालेले नाही. शिरूर ते माजलगाव या भागातील शेतकऱ्यांना जायकवाडीचे पाणी मिळावे यासाठी गेल्या वर्षभरापासून लोकलढा आंदोलन चालू आहे. याच आंदोलना अंतर्गत दुसरा टप्पा म्हणून तांदळा येथे अजय पाटील साळुंखे यांनी रविवारपासून उपोषण सुरू केले आहे. सोमवारी या उपोषणाला कोळगाव ,साक्षाळ पिंपरी, शेकटा, पान २ वर

## कीर्तनातून लोकजागृती

या लोकलढा आंदोलनाची माहिती सर्व शेतकऱ्यांना व्हावी यासाठी तांदळा ग्रामस्थ व युवा सरपंच नवनाथ गवते, पत्रकार संतोष भारती, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल लोंढे, समन्वयक दिनेश गुळवे, मच्छिंद्र मामा गावडे यांनी आंदोलन स्थळी दररोज रात्री कीर्तनाचे आयोजन केले आहे. रविवारी रात्री अमोल महाराज डोंगरे यांची कीर्तन झाली. आपल्या भागासह मराठवाड्याला विकासासाठी शेतीला पाण्याची तीव्र गरज असल्याची प्रतिपादन यावेळी डोंगरे महाराज यांनी केले. शेती व शेतकरी जगविण्यासाठी आपल्या शेतीला जायकवाडी अथवा कृष्णा खोऱ्याचे पाणी मिळाले पाहिजे अशीही आग्रही मागणी त्यांनी केली.

# गावरस्कर आण्णांचा गौरव सोहळा

## ऋणानुबंध:पत्रकार मित्र मंडळीकडून सत्कार

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:येथील ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम आण्णा गावरस्कर यांना अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा नागोराव दुधगावकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्याबद्दल बीड येथील पत्रकार मित्र मंडळींच्या वतीने गौरव सोहळा बुधवार २८ मे रोजी १२.३० वाजता पत्रकार भावन येथे आयोजित केला आहे.



यापूर्वीचा हा पुरस्कार बीड येथील ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख आप्पा यांना देण्यात आला होता, यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि मान्यवरांच्या उपस्थितीत अलिबाग येथील सोहळ्यात बीडचा मोठा सहभाग राहिला होता. यावर्षी मधुकर भावे यांच्या जीवनगौरव पुरस्कार सन्मानासोबतच बीड येथील संपादक गावरस्कर आण्णा यांना नागोराव दुधगावकर पुरस्कार घोषित झाला असून मुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच मुख्य गौरव सोहळा मुंबईत संपन्न होणार आहे.

यानिमित्ताने बीड येथील पत्रकार मित्र मंडळी च्या वतीने आण्णांचा सन्मान ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी सोलापूर आणि अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या उपस्थितीत बुधवारी होत आहे. बीडच्या पत्रकारितेच्या या सन्मान सोहळ्यास, संपादक , पत्रकार, माध्यम क्षेत्रातील मित्रांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## कोणास ‘शक्ती’ कोणाचे ‘पीठ’?

शक्तिपीठ महामार्गाची गरज काय, लाभ कोणास या प्रश्नांकडे न पाहता कंत्राटदारांसाठी सरकारने जमीन अधिग्रहण दलालाची भूमिका निभावणे कितपत योग्य?

‘लोकसत्ता’ने गेल्या आठवड्यात महाराष्ट्रातील प्रस्तावित ‘शक्तिपीठ’ महामार्ग प्रकल्पाचा सर्व दिशांनी धांडोळा घेणारी वृत्तमालिका प्रकाशित केली. या प्रकल्पाचा सामाजिक तसेच आर्थिक जमाखर्च मांडणे हा त्यामागील उद्देश. प्रकल्प कोणताही आणि कोणाचाही असो. तो वैयक्तिक असो वा सरकारी. त्यासाठी होणारा खर्च आणि मिळणारी जमा याचा विचार आत्यंतिक गरजेचा. तो वैयक्तिक पातळीवर करावाच लागतो. कारण तो न केल्यास दिवाळखोरीची हमी. व्यक्तीचे उत्पन्न मर्यादित. त्यामुळे त्यात काय काय होऊ शकते या शक्याशक्यतेचा विचार करण्यास पर्याय नाही. सरकारबाबत मात्र असे म्हणता येत नाही. कारण वैयक्तिक पातळीवर द्यावा लागतो तसा हिशेब सरकारी खर्चास द्यावा लागत नाही आणि वर उत्पन्नाची ददात नाही. शिवाय हे हवे ते खर्च पेलण्यासाठी महसूल सरकारी तिजोरीत येत राहील याची हमी देणारा असा निश्चित करदात्यांचा एक वर्ग असतो. त्या ‘आयजी’च्या जिवावर सरकारला आवडत्या ‘बायजी’चा खर्च चालवणे शक्य होते. या जोडीला ‘सामाजिक कल्याण’, ‘व्यापक हित’, ‘भविष्याचा विचार’ अशी शब्दबंबाळ कारणे पुढे करत सरकार वाटेल तो निर्णय घेऊ शकते. या अशा निर्णयांतून राजकीय हिताखेरीज काय साध्य झाले याचे उत्तर आपल्या व्यवस्थेत मिळू शकत नाही. ते मागण्याची प्रथा नाही आणि व्यवस्थाही नाही. अशा हिशेबशून्य निर्णयांचे दाखले निश्चलनीकरण, अर्धामुर्धा वस्तू–सेवा कर वा ८० कोटी गरिबांना मोफत रेशन वा ‘लाडकी बहीण’ योजना आदींतून सहज मिळतील. आगामी शक्तिपीठ महामार्ग या निर्णयांच्या रांगेत जाऊन बसणार का; हा प्रश्न.

प्रत्येक विचारीजनास तो पडायला हवा याचे साधे आणि किमान तार्किक कारण म्हणजे या प्रकल्पाची रचना. हा साधारण ८०० किलोमीटर इतक्या लांबीचा महामार्ग महाराष्ट्राच्या दीर्घकालीन हितासाठी, भविष्यासाठी, पुढच्या पिढीसाठी इत्यादी इत्यादी कारणाने महत्त्वाचा आहे हे समजा मान्य केले तर त्यातून एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. मग सरकार या प्रकल्पापासून दूर का, हा तो प्रश्न. या प्रकल्पासाठी सरकार स्वत:चा एक रुपयाही गुंतवणार नाही, सर्व काही कंत्राटदारांहाती सोपवणार आणि स्वत: त्या कंत्राटदारांसाठी फक्त जमिनी मिळवून देणारी ‘एजंट’ची भूमिका घेणार, हे कसे? आताच या प्रकल्पाचा खर्च ९० हजार कोटी रुपयांच्या घरात आहे. सध्याचा प्रकल्प खर्चवृद्धीचा वेग लक्षात घेतल्यास तो एक लाख कोटी रुपयांचा टप्पा किरकोळीत ओलांडेल हे भाकीत राज्यातील नवजात अर्भकही व्यक्त करू शकेल. अशा वेळी तब्बल लाखभर कोट रुपयांचा प्रकल्प फक्त आणि फक्त कंत्राटदारांच्या जिवावर सोडायचा? खरे तर हे संभाव्य कंत्राटदार कोण असतील याचाही अंदाज सद्या:स्थितीत अगदी नवजात नाही; पण शालेय पातळीवरील विद्यार्थी निश्चित वर्तवू शकतील. हे प्रारूप काही वर्षांपूर्वीच्या ‘विशेष आर्थिक क्षेत्र’ (एसईझेड) या प्रयोगाची आठवण करून देते. त्याही वेळी खासगी विकसकांसाठी सरकारने केवळ ‘जमीन दलाला’ची भूमिका पत्करली आणि नवी मुंबईतील हजारो हेक्टर जमीन ‘एसईझेड’साठी देण्याचा घाट घातला. जागरूक नागरिकांनी त्या विरोधात छेडलेले आंदोलन आणि बदलते अर्थकारण यामुळे बरेच ‘एसईझेड’ सुदैवाने बाराच्या भावात गेले. तथापि आताही खासगी कंत्राटदारांच्या व्यवसाय विस्तारासाठी सरकार पुन्हा एकदा तीच– म्हणजे जमीन अधिग्रहित करून देणारे दलाल– भूमिका स्वीकारताना दिसते. मुद्दा इतकाच नाही.

कृषी क्षेत्राच्या प्रगतीबाबत गुजरात, मध्य प्रदेश आदी राज्यांच्या तुलनेत आजमितीस महाराष्ट्र मागे आहे. कृषी विकास शून्याखाली उणे नोंदवला जाण्याची नामुष्की महाराष्ट्राने अनुभवली त्यास फार काळ लोटलेला नाही. असे असताना राज्यातील लागवडीखालील प्रचंड जमीन या प्रस्तावित शक्तिपीठाखाली वाया घालवणे कितपत शहाणपणाचे? ‘लोकसत्ता’ने रविवारी प्रकाशित केलेल्या तपशिलानुसार गेल्या पाच वर्षांत तब्बल सव्वातीन लाख हेक्टर शेतजमीन शेतीबाह्य कारणांसाठी सरकारने वळवली. आपल्या राज्यात शहरीकरणाचा वेग अधिक. त्यामुळे उकिरड्याप्रमाणे पसरत्या शहरांस सामावून घेण्यासाठी शेतजमिनींचे रूपांतर ‘बिगर शेतजमिनी’त करून देणाऱ्या राजकारण्यांचा धंदाही पूर्ण जोमात. असे असताना पश्चिम महाराष्ट्रातील चांगली फळती जमीन आणखी मोठ्या प्रमाणावर या कथित महामार्गासाठी वाया घालवण्यात कोणता शहाणपणा? एका अंदाजानुसार या कथित ‘शक्तिपीठ’ महामार्गासाठी चांगली, सुपीक, लागवडीखालची तब्बल १० हजार हेक्टर इतकी जमीन संपादित करावी लागणार आहे. एका बाजूला धरणे बांधायची, पाटबंधारे योजना आखायच्या, त्यासाठी हजारो कोटी रुपये खर्चायचे. का? तर अधिकाधिक जमीन ओलितखाली येऊन शेतकऱ्याचे उत्पन्न वाढावे. आणि नंतर तीच लागवडीखालची जमीन या अशा कंत्राटदार–केंद्री प्रकल्पांसाठी हस्तांतरित करायची? म्हणजे हे दुहेरी नुकसान. पाटबंधारे, कालवे, धरणे आदींचा खर्च वाया जाणार आणि चांगली फलती जमीन शेतीबाह्य कारणांसाठी वापरून वर पुन्हा शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार. हे नुकसान सरकारचे, म्हणजेच नागरिकांचे आणि खरा फायदा मात्र नुकसानभरपाई देत असल्याचा आव आणणाऱ्या कंत्राटदाराचा, असा हा प्रकार.तिसरा मुद्दा अशा महामार्गाच्या गरजेचा. ती कोणी, कधी व्यक्त केली? या संभाव्य महामार्गावरील तीर्थस्थानांस भेटी देण्यासाठी सद्या:स्थितीत अनंत अडचणी असून त्या सोडवण्यासाठी सरकारने तातडीने नवीन एका भव्य महामार्गाची उभारणी हाती घ्यावी, अशी मागणी कोणा नागरिक समूहाने केली होती काय? तसे असेल तर सरकारने किती प्रवासी कोणत्या परिसरातून या महामार्गावरील तीर्थस्थानांस भेट देतात याची आकडेवारी प्रसृत करावी.

# आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना शेतीचे धडे

## सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी करावी. यात जमिनीची योग्य निवड, सिंचन, खत आणि कीटकनाशकांचा योग्य वापर कसा करावा. तसेच पीक व्यवस्थापनाचे तंत्रज्ञान कसे असावे याचे प्रात्यक्षिक थेट शेतीत केले जाते. दरवर्षी येथे विद्यार्थी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेती प्रात्यक्षिकांचे धडे प्रगतशील भारताच्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी महत्वाचे असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून दरवर्षी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला शेती विद्यार्थी, प्राध्यापक पिकवतात. त्यातून विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील सखोल माहिती मिळते.

कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष शेती व त्यातही शास्त्रीय दृष्ट्या व्यवस्थापन करण्याचा अनुभव मिळतो. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर घरच्या शेतीत किंवा नोकरी व्यवसायात त्याचा चांगला उपयोग होतो. आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, प्रा. श्याम भूतडा, प्रा. अमोल सानप, प्रा.जुबेर बागवान. प्रा ज्ञानेश्वर गव्हाणे. प्रा. सुधीर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी हा अनुभव दरवर्षी घेतात.



### शास्त्रीय शेतीचे फायदे उत्पादन वाढ

योग्य तंत्रज्ञान आणि पद्धती वापरून पिकांचे उत्पादन वाढवता येते.खर्चात बचत: रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा योग्य वापर केल्याने खर्चात बचत होते.जमिनीचे आरोग्य: शास्त्रीय शेतीमुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते. पिकांची गुणवत्ता: योग्य तंत्रज्ञान वापरल्याने पिकांची गुणवत्ता सुधारते. पर्यावरणाची काळजी: शास्त्रीय शेतीमुळे पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होतो.

### विद्यार्थ्यांनी कलिंगडाच्या शेतीतून मिळवले दीड लाखाचे उत्पादन

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी घडला पाहिजे. तो केवळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादीत न राहता. तो त्या–त्या क्षेत्रात प्रत्यक्ष उतरला पाहिजे यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच विविध उपक्रम राबवले जात आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चालू हंगामात २० गुंठ्यांत कलिंगडाचे १५ टन इतके विक्रमी उत्पादन घेऊन किमया केली. या कलिंगड उत्पादनातून त्यांनी दीड लाख रुपयांचे उत्पादन देखील मिळवले.

प्रत्येक शनिवारी शेतकऱ्यांना मिळणार मार्गदर्शन

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शेतकऱ्यांनी कोणत्या हंगामात कोणते पिक घ्यावे त्या संदर्भात शेतीची मशागत कशी आणि केव्हा करावी. पिक घेतांना कोणते औषध केव्हा आणि किती फवारावे. या संदर्भात शेतकऱ्यांना कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात करण्यात येणार आहे.

–डॉ. सतीश कचरे, प्राचार्य आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय.

# प्रवाशांच्या सोयीसाठी ठेवलेले सिमेंटचे बाकडे तोडले

## शिवाजीनगर पोलिसांचे साफ दुर्लक्ष –एस.एम.युसूफ़

बीड/प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे समोर प्रवाशांना बसण्यासाठी ठेवण्यात आलेल्या सिमेंटच्या तीन बाकड्यांपैकी एक तोडल्याचे दिसून आले आहे. मात्र याकडे शिवाजीनगर पोलीस ठाणे कर्मचाऱ्यांचे साफ दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



याविषयी दिलेल्या प्रसदी पत्रकात नमूद केले आहे की, समाजात असे काही लोक असतात जे परोपकारी विचाराने समाजासाठी, लोकांसाठी काहीतरी करतात. मात्र अशा लोकांनी लोकांसाठी केलेल्या कार्याचे महत्त्वच समाजाला किंवा लोकांना असल्याचे दिसून येत नाही. म्हणूनच की काय बार्शी रोडवरील शिवाजीनगर पोलीस ठाणे समोर असलेल्या बस थांब्यावर बसची वाट पहात मोठ्या संख्येने उभे राहणाऱ्या प्रवाशांसाठी सिमेंटचे तीन बाकडे ठेवण्यात आले होते. यापैकी सिमेंटचे एक बाकडे तोडून टाकलेल्या अवस्थेत दिसून आले आहे. हे पाहता उर्वरित दोन सिमेंटच्या बाकड्यांसोबत सुद्धा कधी काय घडेल हे सांगता येत नाही. आता त्या तुटलेल्या बाकड्यावर पाय देऊन काही टारगट मुले शिवाजीनगर पोलीस ठाणे च्या संरक्षक भिंतीवर बसून मोबाईल बघण्यात व्यस्त झालेले दिसून येतात. हे पाहता अशाच मुलांनी बसण्याच्या बाकड्यावर उड्या मारून तर ते तोडले नसावे ना असा प्रश्न उपस्थित होत आहे. म्हणून लोकांनी लोकांसाठी करावं तरी काय? लोकांना काहीच समजत नाय. प्रवाशांच्या सोयीसाठी ठेवलेले सिमेंट चे बाकडे तोडून टाकले हाय. असे म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही. तर याकडे शिवाजीनगर पोलिसांचेही साफ दुर्लक्ष असल्याचे यामुळे दिसून आले आहे. यामुळेच येथे एका बाकड्याची तोडफोड करून नासधूस करण्यात आली आहे. हे कमी होते की काय तरुण मुले–मुली या बाकड्यांवर पाय ठेवून शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या संरक्षक भिंतीवर बसून मोबाईल पाहण्याचा उद्योग करत असताना पोलीस कर्मचारी त्यांना साधे हटकत सुद्धा नाहीत. अशा हलगर्जीपणामुळेच उरफाट्या टाळक्यांचे फावते आणि त्यांच्याकडून इतरांना त्रास होईल असे उद्योग केले जाते मात्र शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलिसांना याचे कुठलेही सोयरसुतक नसल्याचे दिसून येते. असेही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

# अवकाळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पंचनामे करून भरपाई द्यावी: सुरेश धस

आष्टी/प्रतिनिधी

अवकाळी पावसाने रब्बीचे नुकसान झालेल्या भागातही मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुषंगाने मराठवाड्यासह आष्टी मतदारसंघात पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्यात पावसाने मे महिन्यातच धुमाकूळ घातला आहे. गेल्या आठ दिवसांत पावसाने आष्टी,पाटोदा,शिरुर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतक–यांचे नुकसान झाले आहे.दि. १२ मे पासुन सुरू असलेल्या अवकाळी पाऊस (अतिवृष्टी) झाल्यामुळे.. शेतकऱ्यांच्या कांदा, उन्हाळी बाजरी, चाऱ्याची मका इत्यादी हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

त्या अनुषंगाने रविवार (दि.२५) रोजी सायंकाळी ६ वा.आमदार सुरेश धस यांनी पावसाचा आढावा घेतला.यावेळी ते बोलत होते.पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,गेल्या आठ दिवसांपासून आष्टी मतदारसंघातील तिन्ही तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला आहे.यामध्ये कांदा,आंबा,डाळींब यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आष्टी, पाटोदा, आणि शिरूर का. या तीनही तहसीलदार, गट विकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याशी दोन दिवसांपूर्वी बैठक घेत याबाबत चर्चा झाली होती, त्यानुसार आजपासून कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक यांनी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे सुरु झाले आहे. त्यामुळे सर्व बाधित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती, संबंधित तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांना देऊन पंचनामे करण्यासाठी सहकार्य करावे.सर्व नुकसानीचा अहवाल दोन दिवसांत देण्याच्या सुचना आमदार सुरेश धस यांनी दिल्या आहेत.

पान एक वरून

**हिंदी-इंग्रजीसोबत मराठी**

बैठकांना संबंधित केंद्र शासनाच्या कार्यालयातील प्रमुखांना आमंत्रित करून त्रिभाषी सूत्रानुसार मराठी भाषेच्या वापराबाबत त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करावी असे राज्य सरकारने आदेशात म्हटले आहे.

**बीडमध्ये रिपाइंची भारत**

येणार आहे. भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार असल्याची माहिती भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. बीड शहरात जिल्हा रिपाइंच्या वतीने काढण्यात येणारी भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी यांच्यासह रिपाइं कार्यकर्त्यांनी भारत जिंदाबाद यात्रेत हजारोच्या संख्येने सामील होऊन भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करावी असे आवाहन यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

**गढी जवळ भीषण अपघात; ६**

मनोज करांडे, कृष्णा जाधव, दिपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा मृत्यू झाला आहे. तर एक व्यक्ती गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.दरम्यान, अपघातानंतर काही वेळातच घटनास्थळी गेवराई पोलिस दाखल झाले. अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्याचे काम सुरू असून, वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. अपघाताच्या ठिकाणी अजून एक दुय्यम अपघातही घडला असून त्यातही एकजण जखमी झाला आहे.या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण गेवराई तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात असून, नागरिकांनी या मार्गावर वाहतुकीदरम्यान अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**तांदळा उपोषणात शेतकऱ्यांचा**

मादळमोही, कुकडगाव, मातोरी, सिरसमार्ग, पोखरी, तालखेड यासह इतर ठिकाणच्या तरुण व ज्येष्ठ शेतकऱ्यांनी भेट देत उपोषणात सहभाग घेतला. जायकवाडी धरणाची अथवा कृष्णा खोऱ्यातील पाणी मिळावी यासाठी गेल्या एक वर्षापासून लोक लढा आंदोलन सुरू आहे. मात्र अद्यापही या शेतकऱ्यांची शासनाकडून मानावी तशी दखल घेतली जात नसल्याने शिरूर ते माजलगाव दरम्यानच्या शेतकऱ्यांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासनाला वारंवार मागणी करूनही धरणाचे पाणी दिले जात नसल्याने शिरूर ते माजलगाव दरम्यानची शेती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे, याचे परिणाम शेती व शेतकऱ्यांवर होत आहे. या भागात बारमाही बागायत शेती नसल्याने शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्यांच्या मुलांचे विवाह, शिक्षण, बेरोजगारी असे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहे. सोडवण्यासाठी येथील शेती बारमाही पाण्याखाली आली पाहिजे या विचाराने जात, धर्म, पंथ, पक्ष, कुठलीही संघटना याचा विचार न करता १४० गावातील शेतकरी एकत्र आले असून त्यांनी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा आता तांदळा येथे सुरू झाला असून गावचे शेतकरी या आंदोलनास भेट देऊन सहभाग घेत असल्याचे दिसून येत आहे. सोमवारी दुपारी मादळमोही प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या पथकाने भेट देत तपासणी केली.

पान सहा वरून

**नायगाव येथे रक्तदान**

धम्मपाल होके, रत्नदीप खोडसे,शुभम गुजर,शंकर सोमवंशी,अमोल खोडसे,मिलिंद खोडसे,विश्वजित खोडसे,दशरथ खोडसे,मनोज गुजर,अशोक महामुनी,गोविंद सोमवंशीपत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह गावातील, नागरिक, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिवसेना शिंदे गटाची**

पत्र देण्यात आले आहेत यावेळी शिवसेनाचे बाजीराव चव्हाण, संपर्क प्रमुख बापुसाहेब मोरे,मरावाडा नेते अशोक पटवर्धन,जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सोप्निल गलधर, जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांची प्रमुख उपस्थिती होती. या निवडी मध्ये उपजिल्हाप्रमुख नारायण शिंदे, गेवराई तालुका प्रमुख उध्दव मडके,विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहारप्रमुख मुकेश महाजन,शहर संघटक सुनिल मोटे यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत. दरम्यान या निवडीबद्दल नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख उध्दव बापू मडके, शहरप्रमुख मुकेश आण्णा महाजन यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले असुन गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावत शिवसेना पक्ष वाढीसाठी,समाजीक हिताचे व शिवसेना पक्षाच्या आदेशानुसार काम करणार असल्याचे यावेळी सांगितले आहे

**केज पंचायत समितीत**

पंचायत समितीच्या अधिकारी कर्मचारी यांनी जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगुन लाच स्वीकारावी लाच घेण्यासाठी कर्मचारी डियुटी संपली तरी पंचायत समिती कार्यालय सोडायला तयार नाहीत तरी बिडीओ मॅडम यांनी अशा अधिकारी कर्मचारी यांच्या वर कार्यवाही केली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**बीडमध्ये साथी मोहिमेचा**

सर्वागिण पुनर्वसन आणि विकास हे मुख्य उद्देश आहे. या प्रक्रियेमध्ये विधी सेवा यंत्रणा, स्थानिक प्रशासन, पोलिस विभाग, सामाजिक संस्था आणि बालकल्याण समित्या एकत्रितपणे काम करणार आहे.मोहिमेच्या शुभारंभाप्रसंगी न्या. आर.जी.बागडे यांनी होलिस्टीक इनक्ल्युजन या संकल्पनेवर प्रकाश टाकतांना सांगितले की, ही मोहिम केवळ आधारकार्ड नोंदणी पुरती मर्यादित नसुन त्यामध्ये मुलांचे सामाजिक, शैक्षणिक आरोग्य व कायदेशीर हक्काचे संरक्षण आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी एकात्मिक दृश्टीकोन ठेउन काम करणार असल्याचे सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव आर. जि. बागडे यांनी साथी मोहिमेचा उद्देश, अंमलबजावणी प्रक्रिया व अपेक्षित परिणाम याबबत मार्गदर्शन केले.साथी मोहिम जिल्हयात यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित विभाग, शासकीय अधिकारी, सामाजिक संस्था आणि विधी स्वयंसेवक/अधिकारमित्र सज्ज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर. एस. गावरस्कर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्वयंसेवक जी.जी. पीटील यांनी केले.

**पालिकेकडून मैला मिश्रित**

व्यक्त केले.या मोर्चा प्रसंगी विलास नाना साळवे,नवीन साळवे,सुनील चांदणे,सागर साळवे,अमोल साळवे,प्रदीप साळवे,अजय साळवे,भूषण साळवे,अजय साळवे व इतर नागरिक उपस्थित होते.

**खाजगी सावकारांना सुळसुळाट**

पडेल कारण केज तालुक्यात खाजगी सावकारांना मोठ्या प्रमाणात सावकारीचा माज चढला आहे त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत काही नागरिकांची मजबूरी म्हणून पैसे घेतात व जमीन लिहून देतात परंतु ती जमीन परत देण्यासाठी खाजगी सावकार गोरगरीब जनतेची पिळवणूक करतात नंतर नागरिक त्रस्त होऊन आत्महत्या करण्याची वेळ येते अशा मनमानी पद्धतीने वागणाऱ्या खाजगी सावकारांना प्रशासनाने तातडीने कारवाई केली पाहिजे कारण अनेक नागरिक केज तालुक्यात चिंताग्रस्त आहेत त्यांना खाजगी सावकारा पासून बचाव करण्यासाठी कुठल्याही प्रकारचा आधार नाही त्यामुळे केज तालुक्यातील खाजगी सावकारांना प्रशासनाने वेळेवरच अक्कल घडविणे गरजेचे आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# ऑल इज वेल...





स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या महायुतीला जनतेने महाप्रचंड बहुमताने निवडून दिले. विधानसभेतील २८८ पैकी २३५ जागांवर महायुतीचे आमदार निवडून आले. भाजपाचे विक्रमी संख्येने १३४ आमदार निवडून आले. सर्वाधिक आमदार असलेल्या पक्षाचे नेते म्हणून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दोन उपमुख्यमंत्री असे महाराष्ट्रात ट्रिपल इंजिन सरकार स्थापन झाले. ज्यांना राजकारणात करिअर करायचे आहे, ज्यांना सार्वजनिक जीवनात उमेदीने काम करायचे आहे, ज्यांना जनसेवेसाठी झोकून द्यायचे आहे, ज्यांचा मोदी-शहांच्या भूमिकेवर आणि भाजपाच्या ध्येय-धोरणांवर विश्वास आहे, त्या सर्वांना महायुतीचा दरवाजा खुला आहे, असा संदेश भाजपाने दिलेला आहे. राज्यात डिसेंबर २०२४ मध्ये महायुतीची ०२ कारकीर्द सुरू झाली पण त्यात कुठेही छगन भुजबळ नव्हते. भुजबळांसाठी हा मोठा धक्का होता. महायुतीच्या सरकारमध्ये आपल्याला डावलण्यात आल्याची भावना त्यांनी अनेकदा बोलून दाखवली. पक्षाच्या अंतर्गत राजकारणामुळे भुजबळांना मंत्रीपदापासून दूर राहावे लागले, अशी उघड चर्चा त्यांच्या समर्थकांत होती. अविभाजित शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकावून शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसमध्ये गेलेल्या भुजबळांना १९९१ पासून राज्यात सतत कॅबिनेट मंत्री म्हणून स्थान होते. पण महायुती सरकारच्या ०२ मध्ये त्यांना मंत्रालयातील सत्तेच्या कॅरिडॉरपासून वंचित ठेवले गेले. ओबीसी समाजाचा आक्रमक नेता महाराष्ट्रात दुसरा कोणी नाही, असे चित्र भुजबळांच्या समर्थकांनी सातत्याने निर्माण केले. भुजबळांना सरकारमधून वगळणे म्हणजे ओबीसी समाजावर अन्याय आहे असे ते ठसवत राहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जायचे असेल तर महायुतीकडे भुजबळांसारखा नेता असणे गरजेचे आहे, असे महायुतीला विशेषतः भाजपालाही वाटू लागले. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या मागणीला उघडपणे विरोध करण्याची हिम्मत भुजबळांनी दाखवली. मराठा आरक्षणाला आपला विरोध नाही पण ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये अशी त्यांनी ताठर भूमिका कायम ठेवली. बीडमधील मस्साजोगच्या सरपंचाच्या क्रूर हत्येनंतर चोहोबाजूने जनाक्रोश प्रकट झाल्याने धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले आणि त्या दिवसापासून त्यांच्याजागी भुजबळ पुन्हा मंत्री होणार अशा चर्चेला उधाण आले.

अवघ्या सहा महिन्यांत भुजबळांचे सरकारमध्ये पुनरागमन झाले, याचे अनेकांना आश्चर्य वाटले आणि भाजपाच्या चतुर खेळीनेही अनेक जण हबकले. भुजबळांच्या पुनरागमनानंतर नाशिक जिल्ह्यातील अनेक नेत्यांना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काहींना आपल्या राजकीय भविष्याची काळजी वाटू लागली. भुजबळांना मंत्री करून भाजपाने एक नेम धरून अनेक तीर मारलेत अशीही कुजबूज ऐकायला मिळाली.

सत्त्याहत्तर वर्षांचे छगन भुजबळ यांची महायुतीला मंत्री म्हणून खरंच गरज वाटते आहे का? ज्या भुजबळांवर भाजपाने शंभर कोटींचा घोटाळा झाल्याचे गंभीर आरोप भाजपाने केले होते, जे भुजबळ ईडी व अँटी करप्शनच्या चौकशीच्या जाळ्यात सापडले होते, जे भुजबळ दोन वर्षे जेलमध्ये होते, ते पुन्हा महायुतीच्या सरकारमध्ये येऊन कॅबिनेटमंत्री म्हणून शपथ घेतात हे अनाकलनीय आहे. भुजबळ कोणामुळे जेलमध्ये गेले व कोणामुळे सरकारमध्ये मंत्री म्हणून परत आले? सरकारमध्ये स्वतः देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजितदादा पवार असे ताकदवान नेते आहेत. महायुतीत नेत्यांची फळी व कार्यकर्त्यांची फौज आहे. चंद्रशेखर बावनकुळे, सुनील तटकरेंसारखे संघटक आहेत. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत रोज कोणीना कोणी नेता अनुयायांसह प्रवेश करीत आहे. तरीही महायुतीला भुजबळांसारखा चेहरा सरकारमध्ये मंत्री म्हणून पाहिजे आहे. यावर्षी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व पंचायत राज समितीच्या निवडणुकांमध्ये मतदारांना आकर्षित करण्यासाठी ताकदवान ओबीसी नेता महायुतीला हवा आहे, हे एकमेव कारण त्यामागे आहे काय? पक्षश्रेष्ठींच्या संमतीशिवाय भुजबळांचा महायुती सरकारमध्ये कोणाचीही मंत्री म्हणून शपथविधी होऊ शकत नाही. त्यामुळे भाजपा श्रेष्ठींनी दिल्लीहून हिरवा कंदील दाखविल्यानंतरच मुंबईतील राजभवनावर राज्यपाल राधाकृष्णन यांनी भुजबळांना कॅबिनेटमंत्री म्हणून शपथ दिली. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या साक्षीने हा शपथविधी सोहळा पार पडला. म्हणूनच भुजबळांना मंत्रीपद देण्यास आम्ही राजी नव्हतो असे कुणालाही उद्या म्हणता येणार नाही. भुजबळांनी भ्रष्टाचाराच्या आरोपावरून दोन वर्षे जेलमध्ये काढली असली तरी त्यांचे निवडणुकीच्या राजकारणातले महत्त्व कायम आहे, हेच त्यांच्या पुनरागमनाने दाखवून दिले आहे.

मुंबईतील भायखळ्याच्या मंडईत भुजबळांचा भाजीपाल्याचा व्यवसाय होता. १९७० मध्ये एक शिवसैनिक म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. त्यावेळी त्यांची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंवर निष्ठा होती. शिवसेनाप्रमुखांच्या आशीर्वादानेच मुंबई महापालिकेवर नगरसेवक, दोन वेळा महापौर, आमदार झाले. १९९१ मध्ये त्यांनी शिवसेनेत बंड केले व डझनभर आमदारांसह काँग्रेसमध्ये गेले. शरद पवारांचा विश्वास संपादन करून त्यांनी राज्यात मंत्रीपद, उपमुख्यमंत्रीपद मिळवले. १९९९ मध्ये ते काँग्रेस सोडून शरद पवारांबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. जुलै २०२३ मध्ये शरद पवारांचे नेतृत्व सोडून ते अजित पवारांच्या बरोबर गेले. आता त्यांचा ओढा भाजपाकडे दिसतो अशी चर्चा उघड होते आहे. शिवसेनेत बंड करून ते काँग्रेसमध्ये गेले तेव्हा शिवसेनाप्रमुखांनी त्यांची लखोबा अशी संभावना केली होती, नंतर सत्तेत असताना भुजबळांनी शिवसेनाप्रमुखांना एका जुन्या प्रकरणात अटक करून दाखवली होती पण ती अटक न्यायालयात क्षणभरही टिकली नाही.

भुजबळांचा मंत्रीपदाचा शपथविधी झाल्यानंतर नाशिक जिल्ह्यात त्यांच्या अभिनंदनाचे फलक लागले. पण माध्यमात व समाज माध्यमांवर भुजबळांवर कोणी, केव्हा, काय भ्रष्टाचाराचे आरोप केले, याच्याही क्लिप्स व्हायरल झाल्या. भाजपाने दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन उभारणीत व अन्य काही प्रकरणात भुजबळांवर शंभर कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप केले होते. जे आज महायुतीच्या सरकारमध्ये आहेत, त्याच नेत्यांनी भुजबळांवर ते मंत्री असताना सत्तेचा गैरवापर केला, असा आरोप केला होता. भुजबळांना तुरुंगवास झाला तो काही स्वातंत्र्यसैनिक म्हणून नव्हे किंवा जनआंदोलन केले म्हणून नव्हे, तर घोटाळा केला म्हणून तपास यंत्रणांनी त्यांना जेलमध्ये पाठवले होते अशा आरोपांचे त्या वेळचे व्हीडिओ आज सोशल मीडियावर फिरत आहेत. भाजपाच्या बड्या नेत्यांनी भुजबळांसारखे हातवारे करीत त्यांच्या नकलाही जाहीर सभांतून केल्या. एवढेच नव्हे असा नटसम्राट महाराष्ट्रात झाला नाही अशीही त्यांची खिल्ली उडवली होती. दहा वर्षांपूर्वी ज्यांनी विरोध केला तेच आता भुजबळांचा महायुतीला (निवडणुकीत मतांसाठी) कसा उपयोग होईल असे सांगत आहेत. भुजबळांना पुन्हा मंत्री करायला जनतेने विरोध दर्शवला नाही व नव्हता. भुजबळांनी मंत्रीपदाची शपथ घेतली म्हणून महाराष्ट्रात कुणीही रस्त्यावर येऊन निषेध नोंदवला नाही. भुजबळांवर ज्यांनी भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले त्यांनीच त्यांना सरकारमध्ये मंत्री म्हणून घेतले, याचे जनतेला आश्चर्य वाटले. भुजबळांना मंत्रीपद मिळाले, याचा अर्थ त्यांच्यावरील शंभर कोटींच्या घोटाळ्याचा आरोप खोटा होता का? ईडी किंवा अँटी करप्शनने त्यांना क्लीनचिट दिली का? ते जामिनावर आहेत, न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केलेले नाही, असे सांगितले जाते, ते खरे आहे का? सत्तेवर नसताना भुजबळ यांनी आपणच ओबीसी समाजाचे तारणहार, रक्षणकर्ते व पालनकर्ते आहोत अशी स्वतःची प्रतिमा निर्माण केली होती. ते केवळ पुन्हा मंत्रीपद मिळविण्यासाठी होते का? भाजपाने गेल्या निवडणूक प्रचारात भुजबळांवर आरोप करून जनतेची सहानुभूती मिळवली. भुजबळ हे खलनायक आहेत, असे चित्र भाजपाने रंगवले होते. आता जनतेने सर्व विसरायचे का? आता भुजबळ एकदम गुणसंपन्न वाटू लागले आहेत. एकदा मान-सन्मान, अधिकार व पद दिले की बाकी सर्व दुय्यम ठरते, हेच यानिमित्ताने महाराष्ट्राला अनुभवायला मिळाले. महाराष्ट्रातील जनतेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आजही मोठा विश्वास आहे. त्यांच्याकडे पाहूनच महाराष्ट्रातील जनता उद्याच्या भविष्याची स्वप्ने पाहत आहे. भुजबळांना सहा महिन्यांपूर्वी डावलण्यात आले तेव्हा ते म्हणाले होते, जहां नही चैना, वहा नही रहना... आणि मंत्रीपदाची शपथ घेतल्यावर ते म्हणाले - ऑल इज वेल, दॅटस एन्ड वेल...

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

# कहाणी कौसल्येची!



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

खानदेशकन्या बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतला एक प्रसंग मला स्तिमित करतो. दारी आलेल्या भविष्य पाहण्याचा दावा करणाऱ्या कुडमुड्या ज्योतिष्याला बहिणाबाई म्हणतात,

बापा नको मारू थापा
असो खऱ्या, असो खोट्या
नाही नशीब नशीब
तयहाताच्या रेघोट्या
नको नको रे ज्योतिषा
नको हात माजा पाहू
माझे दैव मले कये
माझ्या दारी नको येऊ

कवितेत आलेला हा अनुभव बहिणाबाईंच्या आयुष्याशी जोडलेला होता. 'माझे नशीब मला कळते' असे म्हणण्याची ताकद या साध्यासुध्या बाईमध्ये होती. तिच्याशी नाते सांगणाऱ्या ग्रामीण भागातील अनेक स्त्रियांनी आपल्या आत्मसामर्थ्यावर आपले संसार तोलून धरले.

स्वतःची जीवनकथा सांगणे कोणत्याही माणसाला शक्य आहे हा विश्वास मराठीतील 'आत्मकथन' या साहित्यप्रकाराने समाजाला दिला. मुख्य म्हणजे आपली कथा व्यथा सांगणारी अनेक आत्मकथने अनेक स्त्रियांनी मराठीत लिहिली आहेत.

पुस्तकांवर नि माणसांवर प्रेम करणाऱ्या ८६ वर्षांच्या कौसल्याताई पेटकर यांचे 'कौसल्यायन' माझ्या हाती आले आणि त्या पुस्तकाच्या सरळसाध्या शैलीने मला गुंतवून ठेवले.

या पुस्तकातील लोककला नि लोकगीतांबद्दलचा भाग ग्रामीण शिवार आणि परंपरांची खूप सुंदर ओळख करून देतो. 'बैलपोळा' या सणाचे वर्णन करताना पळसाच्या छोट्या फांद्या एकत्र करून, धाग्याने बांधून हळद तेलाचे मिश्रण करून बैलाचे खांदे शेकले जातात, असा उल्लेख येतो. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना' आज आवतन घ्या, उद्या जेवायला या 'असे जेवण्याचे आमंत्रण दिले जाते. बैलांसाठी पोळ्याच्या सणाला म्हटलेल्या गीतांना 'झडत्या' असे म्हटले जाते. वर्तमान काळातील सामाजिक समस्यावर या गीतातून टीका केली जाते. गरिबी, महागाई, भ्रष्टाचार असे विविध विषय व्यंगात्मक शैलीत या गीतांमध्ये गुंफलेले असतात, अशी उदाहरणे कौसल्याताई पुढीलप्रमाणे अगदी सहज देतात.

"पारबतीच्या लुगड्याले छपन्न गाठी
देव कवा धावल गरिबांसाठी"

देवालाच या ओळीत थेट प्रश्न विचारला आहे.

चंद्रपूरमधील 'रामायण' नावाच्या लोककलाप्रकाराचे संदर्भ काळाच्या ओघात लुप्त झालेले असले तरी त्याच्या आठवणी अजून ताज्या आहेत. राजा, त्याच्या दोन राण्या, प्रधान अशी पात्रे या रामायणात असायची. हे लोकरामायण पाहायला घरून गोधडी घेऊन गावकरी जायचे. पूर्वी गावात मनोरंजनाची विशेष साधने नव्हती त्यामुळे रात्री गावकरी या कलेत रमायचे.

आणखी एक गोष्ट गावातील स्त्रियांना जगण्याची उमेद द्यायची. ती गोष्ट म्हणजे गाणी. कौसल्याताईंची अशी धारणा आहे की, गाणे शेतातील कष्ट हलके करते. दळणकांडणातील कंटाळवाणा वेळ सुरम्य करते. घरापासून, आई-बाबा व भावाबहिणीपासून होणारी नवऱ्या मुलीची ताटातूट हलकी करते. बाळाला शांत झोपवण्यासाठी आई अंगाई गाते. प्रत्येकाला काही ना काही दुःख आणि अडचणी असतात, त्या संकटात थोडीफार हळवी झुळूक गाणी घेऊन येतात.

शेतातल्या कामांमध्ये किंवा कठीण प्रसंगांमध्ये गाण्यांनीच विसावा दिला असे म्हणणाऱ्या कौसल्याताई आयुष्याचे गाणे आनंदाने गात आहेत. काळ्या मातीचे वरदान लाभलेल्या ग्रामीण भागातली स्त्री कष्टाला घाबरत नाही. मुलाबाळांमध्ये रमणारी, कुटुंबासाठी जगणारी स्त्री दुःखांना हसत हसत सामोरी जाते. तिच्या आयुष्याची सुफळ संपूर्ण कहाणी अनेक पिढ्यांना प्रेरणा देते.



# भारतातील हुंडाविरोधी चळवळीच्या प्रणेत्या...



दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

हे वर्ष २०२५ आहे. तीन वर्षांपूर्वी आपण स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी केली. १५ दिवसांपूर्वी 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम राबवून पाकिस्तानला धडा शिकवला. या मोहिमेची माहिती सोफिया कुरेशी आणि व्योमिका सिंग या दोन भारतीय महिला सैन्याधिकारी पत्रकार परिषदेत देत. भारताच्या लेकी किती शक्तिशाली आहेत हे जगाने पाहिलं. धाडसी आणि शूरवीर अशा नवीन भारताचा जगभर डंका वाजत असताना १० महिन्यांच्या बाळाची आई हुंडाबळीची शिकार ठरली. वैष्णवी हगवणे हिने सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. सारा देश हादरला. एकीकडे भारतमातेच्या लेकी जगाला धडकी भरवत आहेत आणि दुसरीकडे तिच्या लेकी हुंड्यासारख्या कुप्रथेला बळी पडत आहे. ४० वर्षांपूर्वी या कुप्रथेविरुद्ध अशाच अभागी मुलीची आई न्यायालयीन लढाई लढली. तिच्यामुळे हुंडाविरोधी कायदा निर्माण झाला. ही लढाऊ आई होती सत्यराणी चड्ढा.

दिल्लीच्या लक्ष्मीबाई कॉलेजमधून पदवीधर झालेल्या शशिबालाचे सुभाष चंद्राशी लग्न झाले. तेव्हा शशिबाला अवघ्या २० वर्षांची होती. सुभाषचंद्र बुटासाठी प्रसिद्ध असणाऱ्या बाटा कंपनीचा व्यवस्थापक होता. लग्नाला अवघे १० महिने झाले होते. शशिबाला स्टोव्हचा भडका होऊन लागलेल्या आगीत भाजली आणि मरण पावली. विशेष बाब म्हणजे ती सहा महिन्यांची गर्भवती होती.

शशिबालाच्या सासरचे लोक स्कूटर, टेलिव्हिजन आणि रेफ्रिजरेटर इत्यादी अनेक गोष्टींची मागणी करत होते. सत्यराणीने त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पण ती तसे करू शकली नाही. तिने कसे तरी टीव्ही आणि रेफ्रिजरेटरसाठी पैसे जमा केले होते पण स्कूटरसाठी पैशांची व्यवस्था करू शकली नाही. तिच्या मुलीच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी जावई सुभाषचंद्र याने सत्यराणीला उर्वरित हुंड्याची (स्कूटर) मागणी पूर्ण न झाल्यास भयानक परिणाम होण्याची धमकी दिली.

शशिबालाने आपल्या अल्पायुषी अशा १० महिन्यांच्या वैवाहिक आयुष्यात आपल्या आईला व माताराणीच्या (देवीच्या) नावे अनेक पत्रे लिहिली. त्यात ती आपल्या आईला एक प्रकारे दिलासा देण्याचा प्रयत्न करत होती की सगळं काही ठीक होईल. तिला हुंड्यावरून जो सासरी जाच होत आहे तसा जाच सुभाषच्या बहिणींना होऊ नये अशी तिची इच्छा होती. हुंडा घेणे व देणे हा १९६० पासून कायदेशीर गुन्हा होता. मात्र हुंडा देणे व घेणे ही सामाजिक प्रथा होती, जी सर्वमान्य होती. आपल्या मुलाला रोख रक्कम, दागिने, गाडी, भांडी, कपडे काही वेळेस तर घर, जमीन हुंड्यात मिळाले असे अभिमानाने सांगितले जायचे. त्यावरून सामाजिक प्रतिष्ठा ठरत असे. इतके भयानक वास्तव त्या काळी होते.

मात्र या कुप्रथेविरुद्ध एक आई, आपल्या मुलीला न्याय देण्यासाठी उभी राहिली. तिला खंबीर साथ मिळाली ती हुंड्यापायी बळी गेलेल्या मुलीची आई असलेल्या शाहजहान आपा यांची. ८०-९० च्या दशकात एका अहवालानुसार १९८७ मध्ये १९०० हुंडाबळी होते. हेच प्रमाण १९९७ मध्ये ६००० झाले. २०११मध्ये तर ८६०० महिला हुंडाबळी ठरल्या. हुंडाबळीच्या प्रमाणाचे एक प्रमुख कारण म्हणजे महिला आणि मुलींना 'ओझे', विशेषतः 'आर्थिक ओझे' म्हणून सतत पहिले गेले. मुलगी वयात आली की तिचं लग्न लावून देणं ही मोठीच जबाबदारी भारतातील पालकांना वाटते. या समस्येवर मात करण्यासाठी, वधूची 'मालमत्ता' घेण्यासाठी वराच्या कुटुंबाला रोख रक्कम, वस्तू किंवा 'भेटवस्तू' स्वरूपात हुंडा देण्याची प्रथा सुरू झाली. तथापि, पती आणि त्याचे कुटुंब लग्नानंतर पत्नी आणि तिच्या कुटुंबावर दबाव आणून आणि गैरवापर करून अधिक वस्तूंची मागणी करतात आणि जे त्यांच्या 'मागण्या' पूर्ण करण्यात अयशस्वी होतात त्यांना हिंसाचार आणि मृत्यूला सामोरे जावे लागते.

१९८० मध्ये सत्यराणीने सुभाष चंद्रा आणि त्याच्या कुटुंबावर कनिष्ठ न्यायालयात खून आणि हुंडाबळीचे आरोप दाखल केले. पोलिसांनी सुभाषचंद्रावर खुनाचा नाही तर हुंडा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत आरोप लावला. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने १९८० मध्ये असा निर्णय दिला की चंद्राने स्कूटरची मागणी लग्नाच्या दहा महिन्यांनंतर केली होती, त्यामुळे त्याचा मृत्यूशी संबंध असू शकत नाही. सत्यराणी यांनी खुनाचा खटला सुरू ठेवला; परंतु न्यायालयात खटल्याची सुनावणी होण्यासाठी २००० पर्यंत वेळ लागला. २००० मध्ये सुभाषचंद्राला आत्महत्येस प्रवृत्त करण्याप्रकरणाच्या आरोपात अखेर दोषी ठरवण्यात आले. अपीलवर, २०१३ मध्ये त्याची शिक्षा कायम ठेवण्यात आली आणि त्याला सात वर्षांची शिक्षा भोगण्याचा आदेश देण्यात आला.

१९८० च्या दशकात, जेव्हा हुंडाबळींच्या घटना वाढत होत्या, तेव्हा सत्य राणी चड्ढा यांनी रॅलींमध्ये भाग घेतला आणि या 'प्रथे'चा अंत करण्यासाठी मोहीम राबवली. १९८७ मध्ये घरगुती आणि लैंगिक हिंसाचारातून वाचलेल्यांसाठी शक्ती शालिनीची स्थापना झाली. हिंसाचारातून वाचलेल्यांना न्याय देण्यासाठी दोघांनीही अनेक कायदेशीर आणि सांस्कृतिक लढाया लढल्या. या लढ्याला कालांतराने यश आले.

यापूर्वी, कायद्यानुसार, हुंड्याची व्याख्या 'लग्नासाठी विचार' अशी केली जात होती. १९८३ च्या पहिल्या दुरुस्ती कायद्याने हुंड्याची व्याख्या बदलून लग्नादरम्यान कधीही 'भेटवस्तू' मागणे समाविष्ट केले. क्रूरतेशी संबंधित प्रकरणांना हाताळण्यासाठी भारतीय दंड संहितेत समाविष्ट केलेल्या फौजदारी कायद्यातील सुधारणा अमलात आणण्यात आली. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ११३ अ मधील दुसऱ्या दुरुस्ती कायद्यात असे म्हटले आहे की, जर विवाहित महिलेचा लग्नाच्या सात वर्षांच्या आत आत्महत्या करून मृत्यू झाला आणि तिच्या पती/सासऱ्यांनी तिला यापूर्वी कोणत्याही प्रकारची हिंसाचार आणि क्रूरता सहन केली असेल तर आत्महत्येस प्रवृत्त करणे गृहीत धरले जाते.

सत्यराणी आणि शाहजहान आपा यांच्या लढ्यामुळे अनेक सासुरवाशीण तरुणींना कायद्याचे संरक्षण मिळाले. दोघांनीही हुंडा वादात आपल्या मुली गमावल्या, त्यांनी न्यायासाठी आणि भारतातील हुंडा प्रथा बदलण्यासाठी दशके एकत्र काम केले. सत्यराणी चड्ढा या भारतातील हुंडाविरोधी चळवळीच्या प्रणेत्या मानल्या जातात. अशी ही लढाऊ आई, सत्यराणी चड्ढा १ जुलै २०१४ रोजी निधन पावली.

भारतातील विवाहित महिलांसाठी त्यांनी अर्ध्याहून अधिक आयुष्य लढण्यात घालवले. त्यांच्यासाठी धैर्य आणि लढाऊ बाण्याचे प्रतीक म्हणून त्या नेहमीच लक्षात राहतील.



# पाणीचं पाणी चहुकडे...



मोरपीस

पूजा काळे

दिवसा कडकडीत ऊन, रात्री गारवा आणि मधल्या वेळेत पाऊस. ऐन वैशाखात अनुभवाला येणारं हे चित्र म्हटलं तर भयावह. एका ऋतुतून दुसऱ्या ऋतूत होणारे स्थित्यंतर आता घडताना दिसत नाही. अचानक आलेल्या तीव्र बदलाला शरीर आणि निसर्ग जुळवून घेत नाही. परिणामी मागे लागतो आरोग्य तक्रारींचा सिलसिला. दुसरीकडे जानेवारीपासूनच जंगलपट्ट्यात पळस फुलणं म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने धोक्याची सूचना, जी निसर्गाचा समतोल ढासळल्याचं दर्शवते. काल-परवापर्यंत उकाड्याने शरीराची काहिली होत असताना, काळजीचा भाग म्हणून लोकांनी पथ्यपाणी पाळा म्हणेपर्यंत, कुठलीही आगाऊ सूचना न देता पाऊस पडला. कमी दाबाचे पट्टे निर्माण करत दाणादाण उडवत, त्याने आपलं अक्राळविक्राळ रूप दाखवायला सुरुवात केली. मे महिन्याच्या पूर्वार्धात पावसाने लावलेल्या हजेरीला या काळातील सर्वाधिक त्रस्त करणारी घटना म्हणता येईल.


सृजनतेचं प्रतीक असलेला पाऊस हा आपला खरा मित्र. त्याने बरसावं, नवचेतना जागवाव्या, आनंद द्यावा घ्यावा. एवढं सोप्प असताना व्याप वाढवत येणाऱ्या पावसाचं मोकळेपणाने स्वागत तरी कसं करावं? त्याचं कोलमडलेलं वेळापत्रक किती वाईट परिस्थिती बघायला लावणारं आहे कुणास ठाऊक...! 'झळा या लागल्या जीवा' म्हणत वेगवेगळ्या ठिकाणी असणारं पाण्याचं दुर्भिक्ष्य, कोरड्या विहिरी, पाणवठे यांची मोजदाद झाली नसताना, वादळासह उच्छाद मांडणारा पाऊस शेतकऱ्यांबरोबर सामान्यांचे तीन तेरा वाजवतोय. जोवर निसर्गाची हाक आपण ऐकत नाही तोवर एक दिवस खरोखर हा निसर्ग आपल्या डोक्यावरील हात काढून टाकेल याची खात्री पटत चाललीयं. बेभरवशाच्या पावसाचा सार्वत्रिक परिणाम अर्थकारणावर होईलचं शिवाय महागाई वाढेल. आज महाराष्ट्रातील अवस्था वाईट आहे. पावसामुळे पीक पाण्याखाली गेल्याने शेतीचं नुकसान झालंय. फळबागा नष्ट झाल्या आहेत. आभाळ फाटल्याचा परिणाम चहूकडे पाण्याचं राज्य घेऊन आलाय.

याची कारणं शोधताना खूप मागे जावं लागेल. महत्त्वाकांक्षेतून क्रांती घडली आणि मर्यादित पातळी ओलांडली गेली. वैश्विक पातळीवर बदलण्याची आस आणि नावीन्याचा ध्यास हा सृष्टीचा स्थायिभाव होता. वैज्ञानिक दृष्टिकोन जपणे हा जग आणि देश प्रगतीपर विचारातील महत्त्वाचा टप्पा होता. विज्ञान विचार यात्रेची चळवळ २१ व्या शतकात झपाट्याने फोफावली आणि मानवी उद्धाराची सर्वोत्तम महत्त्वाकांक्षा राक्षसीवृत्ती दाखवून गेली. मानवाचं निसर्गाशी असलेलं मैत्रीपूर्ण नातं संपुष्टात येताना काही ठळक गोष्टी पुढे आल्या. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीचा विकास झाला. जुनं ते हवं आणि नवं तेही हवं म्हणत, विकासाचे मार्ग खुले झाले. उत्पादन कार्य क्षमतेबरोबर, दळणवळणाच्या सोयी वाढल्या. कृषी क्षेत्रात नवीन शोध लागले. शहरीकरणासाठी जंगल कापून टाकण्यात आली. यामुळे तापमानातली वाढ, तर दुसरीकडे ग्लोबल वॉर्मिंगची भीती बळावू लागली. भूकंप, महापूर, वणवा, नदीचा प्रवाह बदलणे, गारा पडणे, अतिवृष्टी, दुष्काळ याचे परिणाम जाणवू लागले. पृथ्वी आणि हवेच्या तापमान प्रणालीत अपेक्षेपेक्षा जास्त चढ-उतार झाल्याने हवामान बदलाचे परिणाम दिसून आले, ज्यामध्ये वनस्पती, शेती, मानव, पाणथळी आणि इतर प्रणाली समूळ नष्ट होण्याची दाट शक्यता निर्माण झाली. येणारा धोका प्रत्येकी वेगळा असू शकतो हे जाणून वेळस्थानानुसार हवामान बदलाच्या संभाव्य धोक्यांवर लक्ष ठेवून कार्यप्रणाली आखायला हवी. मानवप्राणी वन्यजीव, निसर्ग यांना नवनवीन आव्हानांना सामोरे जावं लागतयं.

वादळवारा, उष्णतेच्या लाटा, पाऊस हे प्राणीमात्रांसह, मनुष्य जीवनाचा अंत ठरू पाहत आहेत. वातावरणात वाढलेली कार्बन, मिथेनची वायूपातळी हवामान बदलाचा स्त्रोत आहे. अन्नप्रणाली, पाण्याचं दुर्भिक्ष्य, वाढणारे मृत्यूदर, हृदयविकार, दम्यासारखे आजार, खाण्याच्या सवयी, उत्पादन साखळी यावर अधिक परिणाम होतोय. वाढलेल्या उष्णतेमुळे हवेत कोरडेपणा येऊन वणवा पेटण्याचे प्रसंग ओढवत आहेत. सागरी वाऱ्याच्या दिशा निश्चित असल्या, तरी उष्णता शोषणारे महासागर वातावरणात सरासरीपेक्षा लक्षणीय बदल घडवतात, ज्यामुळे महासागरातलं आम्लीकरण झपाट्याने वाढतयं. कोरल संपुष्टात येताना जमीन नापीक होण्याचे प्रमाण वाढतयं. हवामान बदलावर उपाय म्हणून, झाडांचं जतन-संवर्धन करणं, कृषी उत्पादकता वाढवणं, स्मार्टशेतीचा पर्याय निवडणं, कचऱ्याचा पुनर्वापर, अक्षय ऊर्जा संसाधनांचा वापर, सार्वजनिक वाहतूक करणं, पाण्याचा अपव्यय टाळणं, विजेची बचत करणं या प्रकारे नियोजन केलं तरंच आपण मोकळा श्वास घेऊ, जेणेकरून पुढच्या पिढीला मदत होईल. निसर्गाचा समतोल सावरण्यास प्रत्येकाने हातभार लावला तर जीवन सुखकारक होईल, जो जगण्याचा तारकमंत्र ठरेल. अन्यथा पाणी पिण्यापुरता उपलब्ध न होता पावसाच्या रूपाने हाहाकार माजवेल आणि चहुकडे पाणीचं पाणी भरेल.



# कोलाज



डॉ. नारळीकर यांची ओळखच इतकी मोठी होती की देशात कुठेही त्यांना सहज प्रवेश होता. मानाचे स्थान होते. पण वैयक्तिक पातळीवर त्यांनी या गोष्टीचा कधीच लाभ उठवला नाही. इतकेच काय पण, कोणी समोर आले तर नमस्कार करत ते अत्यंत मृदू भाषेत 'मी जयंत नारळीकर' अशी आपली ओळख सांगायचे.

## संशोधक घडवणारा शास्त्रज्ञ

प्रासंगिक

**वरुण भालेराव**
शास्त्रज्ञ

डॉ. जयंत नारळीकर यांचे निधन ही भारतालाच नव्हे तर जगाला धक्का देऊन गेलेली बाब आहे. सरांनी विज्ञानविश्वात महत्त्वपूर्ण योगदान दिलेच, खेरीज आपल्या दर्जेदार साहित्यातून सर्वसामान्यांपर्यंत वैज्ञानिक विचार पोहोचवण्याचेही काम केले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने अनेकांना प्रेरणा मिळाली. त्यांची शिस्तप्रियता, अचूकतेचा अट्टहास, कोणत्याही विषयावरील चर्चेत भाग घेत नेमके मत मांडण्याची हातोटी नेहमीच लक्षात राहील.

डॉ. जयंत नारळीकर इतर अनेकांप्रमाणे माझ्यासाठीही रोल मॉडेल होते. किंबहुना, मी खगोलशास्त्रामध्ये कार्यरत होण्यामागील प्रेरणास्थान असणारे हे नाव होते, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. त्यांनी 'आयुका'ची स्थापना केली, तेव्हाच आपले काम लोकांपर्यंत पोहोचवण्याकडे लक्ष देण्याचेही ठरवले. म्हणजे या संस्थेत महत्त्वपूर्ण संशोधन करायचे, त्यासाठी लोकांना तिथे आणायचेच, पण त्याचबरोबर सर्वसामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचवण्यासाठीही धोरणे राबवायची हे त्यांचे धोरण आधीपासूनच निश्चित होते. 'आयुका'च्या ध्येयाचा तो एक भाग होता. त्यामुळे या मार्गानेही संस्था मोठे काम करू शकली.

संस्थेबरोबरच त्यांनी स्वतःच्या विज्ञानविषयक लेखनातून लोकांपर्यंत आपले विचार पोहोचवण्याचा प्रयत्न केला. मराठीमध्ये अनेक लेख, गोष्टी लिहिल्या. या सगळ्यांमुळे पुण्यामध्ये 'आयुका'च्या उपक्रमांची नेहमीच मोठी चर्चा असायची. तिथे विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने असायची, उन्हाळी सुट्टीमध्ये काही खास उपक्रमांची आखणी केली जायची. अशा कार्यक्रमांमधून एवढा महान शास्त्रज्ञ तुमच्यापुढे येतो, त्याला प्रत्यक्ष बघता येते तेव्हा विलक्षण प्रभाव पडणे स्वाभाविक असते. मी तेच अनुभवले. 'आयुका'च्या उपक्रमांमधूनच मी खगोलशास्त्रात पहिले पाऊल ठेवले. त्यांच्याकडे बघतच मोठा झालो. आयुकाच्याच कार्यक्रमांमधून माझ्या मनात या क्षेत्राविषयी आवड निर्माण झाली. इंटर स्कूल ऑलपियाडमधून मी इथे प्रवेश केला आणि खगोलशास्त्राविषयीची आवड दृढ होत गेली. त्यामुळेच आज या क्षेत्रात कार्यरत आहे. अर्थातच डॉ. नारळीकरांमुळे, त्यांच्या कामाच्या प्रभावानेच हे घडू शकले यात शंका नाही. केवळ मीच नव्हे, तर माझ्यासारखे अनेकजण त्यांच्यापासून प्रेरणा घेत इथे आले आहेत. खगोलशास्त्राचा विचार केला तर आज जगात भारताची खास प्रतिमा निर्माण करण्यातही नारळीकर सर आणि त्यांच्या पिढीतील अन्य तज्ज्ञांचा मोलाचा सहभाग मान्य करावा लागेल. त्यांनी देशाला या क्षेत्राची विशेष ओळख करून दिलीच; खेरीज वैज्ञानिक विचार नवीन पिढीपर्यंत अत्यंत प्रभावीपणे पोहोचवले. भारताच्या उंचावलेल्या प्रतिमेमागे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

डॉ. जयंत नारळीकर यांनी विश्वउत्पत्तीशास्त्र आणि विश्वउत्क्रांती या विषयांमध्ये प्रचंड काम केले. या क्षेत्रातील त्यांचे योगदान वादातीत आहे. त्याचबरोबर 'स्टेडी स्टेट थेअरी'वरही त्यांनी मोठे काम केले. या थेअरीने त्यांना जगभर ओळख आणि प्रसिद्धी मिळवून दिली. मी 'आयुका'मध्ये कार्यरत झालो तेव्हा ते निवृत्त झाले नव्हते. मात्र मी त्यांच्या विषयात काम करत नसल्यामुळे चर्चा करण्याची, एकत्र काम करण्याची संधी कधी मिळाली नाही. मात्र माझ्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विलक्षण प्रभाव आहे, हे नाकारून चालणार नाही. कारकिर्दीत उत्तुंग उंची गाठूनही जमिनीलगत राहणारा माणूस असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. त्यांच्या साध्या राहणीचे, प्रगाढ बुद्धिमत्तेचे अनेक किस्से आपण ऐकले आहेत.

डॉ. नारळीकर यांची ओळखच इतकी मोठी होती की देशात कुठेही त्यांना सहज प्रवेश होता. मानाचे स्थान होते. पण वैयक्तिक पातळीवर त्यांनी या गोष्टीचा कधीच लाभ उठवला नाही. इतकेच काय पण, कोणी समोर आले तर नमस्कार करत ते अत्यंत मृदू भाषेत 'मी जयंत नारळीकर' अशी आपली ओळख सांगायचे. अपरिचित व्यक्तीशी याच वाक्यानिशी त्यांच्या संभाषणाची सुरुवात व्हायची. त्यांचे हे एक वाक्य समोरच्या कोणत्याही वयाच्या माणसाला आपलेसे करायचे. या वाक्याने त्याच्यावरील ताण नाहीसा व्हायचा आणि संवाद सहजी घडायचा. स्वभाव इतका सौम्य आणि सौहार्दपूर्ण असल्यामुळेच शाळकरी मुलेही त्यांच्याशी सहज बोलू शकायची. शंका विचारू शकायची. आजच्या भाषेत बोलायचे तर त्यांनी कधीच ॲटिट्युड दाखवला नाही. दांडगा जनसंपर्क असण्यामागील हेदेखील एक महत्त्वाचे कारण होते. ते कोणत्याही विषयावर बोलायला तयार असायचे. विशेष म्हणजे प्रत्येक विषयात बोलण्यासाठी त्यांच्याकडे अनेक संदर्भ आणि महत्त्वपूर्ण मुद्दे असायचे. त्यामुळेच त्यांचे बोलणे अत्यंत प्रभावी व्हायचे.

आजही 'आयुका' ही संस्था जयंत नारळीकर या नावाच्या प्रभावाखाली आहे. त्यांनी तिथे संशोधनाला पुरक ठरणारे वातावरण तयार केले. याचा प्रभाव तेथे येणाऱ्या माझ्यासारख्या प्रत्येकाला जाणवतो. इतर विषयातही मोठे योगदान देणे, साहित्यनिर्मिती करून जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोहोचवणे, देशाला वैज्ञानिक प्रगतीच्या दिशेकडे नेणे हे कामही त्यांनी अत्यंत सहजतेने केले. खगोलशास्त्रातील त्यांचे योगदान याच्या पलीकडे आहेच, पण 'आयुका'सारखी संस्था, वैज्ञानिकांची पुढील पिढी घडवण्याचे कामही आभाळाच्या उंचीचे आहे. त्यांनी हे काम केले नसते तर आज आपण वेगळ्या ठिकाणी असतो.

नारळीकर सरांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले. एखाद्या शास्त्रज्ञाने आपल्या क्षेत्राबरोबरच अन्य प्रांतातही इतके महत्त्वपूर्ण योगदान देण्याचीही कदाचित ही पहिली वेळ असेल. यामागेही भारतात होणारी वैज्ञानिक प्रगती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचाच विचार असावा. असा विचार करणारे द्रष्टे व्यक्तिमत्त्व आता हरपले आहे. नवीन पिढीने त्यांचा वारसा जपला तरच निर्माण झालेली ही पोकळी भरून येऊ शकते. नारळीकर सरांना विनम्र आदरांजली!

अशा या थोर शास्त्रज्ञाच्या निधनामुळे भारताने एक महान शास्त्रज्ञ गमावला आहे. डॉ. नारळीकर यांच्या कार्यामुळे भारतीय विज्ञानक्षेत्राला एक अमूल्य वारसा मिळाला. त्यांच्या योगदानामुळे अनेक पिढ्यांना विज्ञानाची गोडी लागली आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. त्यामुळेच आता हा वारसा जतन करण्याची जबाबदारी नवीन पिढीवर आहे. त्यांच्या पत्नी गणितज्ञ डॉ. मंगला नारळीकर यांचे २०२३ मध्ये निधन झाले. त्यांनीही गणिताच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले आणि शालेय गणित अभ्यासक्रमाच्या पुनरावलोकनात सक्रिय सहभाग घेतला. हे दांपत्य 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या उक्तीचे मूर्तिमंत प्रतीक होते. दोघांनीही हयातभर अनेक उपक्रमांमध्ये नवी पिढी घडवण्यात, संस्कारित करण्यात, विज्ञान आणि गणिताची गोडी निर्माण करण्यात मोलाची भूमिका बजावली. डॉ. नारळीकर यांच्या कार्यामुळे भारतीय विज्ञानक्षेत्राला एक वेगळी उंची मिळाली. अनेकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास त्यांच्या अव्याहत सुरू असणाऱ्या कामाचा मोठा वाटा होता. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून येणार नाही.

डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे भारतीय खगोलशास्त्रज्ञ, विज्ञान लेखक आणि शास्त्रीय विचारसरणीचे प्रबोधन करणारे महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांनी 'क्वासी-स्टेडी स्टेट' सिद्धांत विकसित करून बिग बँग सिद्धांताला आव्हान दिले. या संशोधनामुळे त्यांनी भारतीय आणि जागतिक खगोलशास्त्राच्या क्षेत्रात दिलेले महत्त्वपूर्ण योगदान समस्त विश्वाने मान्य केले. १९८८ मध्ये पुण्यात 'इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स' (आयुका) या संस्थेची स्थापना करून त्यांनी भारतीय खगोलशास्त्राच्या शिक्षणाला एक नवी दिशा दिली. ते २००३ पर्यंत या संस्थेचे संचालक होते. विज्ञानविश्वातील उत्तुंग कारकिर्दीबद्दल त्यांना वेळोवेळी विविध सन्मानांनी गौरवण्यात आले. यामध्ये 'पद्मभूषण' (१९६५), 'पद्मविभूषण' (२००४), 'महाराष्ट्र भूषण' (२०१०), 'कालिंग पुरस्कार' (१९९६), 'ॲडम्स पुरस्कार' (१९६७), 'स्मिथ्स पुरस्कार' (१९६२) आणि 'साहित्य अकादमी पुरस्कार' (२०१४) यांसारख्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचा समावेश आहे. डॉ. नारळीकर प्रसिद्ध शास्त्रज्ञ असण्याबरोबर उत्तम विज्ञान लेखकही होते. त्यांनी 'यक्षांची देणगी', 'वामन परत ना आला', 'अंतराळ आणि विज्ञान' यांसारखी विज्ञानविषयक लोकप्रिय पुस्तके लिहिली. त्यांच्या आत्मकथनपर 'चार नगरातले माझे विश्व'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

## निसर्गसंपन्न आणि सुरक्षित शिलाँग



विशेष



**मृणालिनी कुलकर्णी**

भारताच्या ईशान्य भागात स्थित असलेल्या सात भगिनी राज्यांपैकी एक मेघालय! ढगांचे निवासस्थान! येथे ढग जमिनीवर येतात. डोंगरांनी वेढलेले उंच पठार! भौगोलिक आणि जैवविविधतेच्या दृष्ट्या संपन्न! मेघालयाच्या बाजूला आसाम आणि बांगलादेश आहेत. १९७२ मध्ये मेघालय राज्याच्या निर्मितीनंतर मेघालयचे तीन टेकड्यांत विभाजन झाले. खासी टेकडी, गारो टेकडी आणि जैतिया टेकडी.

खासी टेकडीवर वसलेले शहर शिलाँग, हे एक हिल स्टेशन असून मेघालयाच्या नैसर्गिक लँड्स्केपचे प्रवेशद्वारही आहे. मेघालयची राजधानी शिलाँग असून ते सर्वात मोठे, लोकप्रिय आणि पर्यटकांचे आवडते स्थळ आहे.

धुक्यात हरवलेले शिलाँग पाहणे ही एक वेगळीच अनुभूती आहे. फोटो काढेपर्यंत ढग पुढे सरकतात. हिरव्यागार टेकड्या, पाहावे तेथे पाण्याचे कोसळणारे धबधबे, बोटिंगसाठी जलाशय, दऱ्याखोऱ्यांना कमतरता नाही, अनेक विविध प्रजातींच्या झाडांनी घेरलेली जंगले, थंड हवामान म्हणूनच शिलाँगला पूर्वेकडील स्कॉटलंड म्हणतात. याशिवाय साहसी लोकांसाठी हायकिंग, ट्रेकिंग, जंगलातील ट्रेल्स, गाडी चालवणे, संगीत, जोडीला खाणे असे जुन्या आणि आधुनिक, सांस्कृतिकचे मिश्रण आहे. त्यासाठी मुक्काम आवश्यक.

प्राकृतिक सौंदर्याबरोबरच मेघालय - शिलाँगमधील वैशिट्य -१ येथे चुनखडीमुळे सिमेंटची मुबलकता असूनही येथील खासी -आदिवासी लोक कार्बनपासून दूर झाडांच्या जवळ राहतात. या लोकांनी रबराच्या झाडाच्या मुळांपासून तयार केलेली नदी पार करण्यासाठी मजबूत ब्रिज. डबलडेकरसुद्धा. ब्रिज करायला २५ वर्षे लागतात आणि ५०० वर्षे टिकतात. रस्त्यात इतरत्र बांबूचे ब्रिज, बाके, शंकूच्या आकाराचे डस्ट बिन साऱ्या वस्तू झाडापासून केलेल्या. २) येथील खासी लोकांचा वांशिक समूह आहे. भाषा खासी. खासी लोकांचा पारंपरिक 'जैन सेम' हा पोशाख वैशिट्यपूर्ण आहे.

खासी जमातीत महिला प्रधान संस्कृती असून ती घरात कर्ती असते. लग्नानंतर मुलगा मुलीकडे जातो. डोंगरात राहणारे हे खरे गिरिजन. ब्रिटिशानमुळे ते ख्रिश्चन झाले.

३) खासी रहिवाशांना संगीताची प्रचंड आवड. वर्षभर येथे पाश्चात्त्य संगीताच्या मैफली होतात. या रॉक संगीतामुळेच शिलाँग ही भारताची रॉक संगीताची राजधानी आहे. कडक उन्हाळा, गर्दीपासून दूर चलो, - 'निसर्गसंपन्न आणि सुरक्षित शिलाँग.'

एप्रिल अखेर आम्ही चौघेजण विमानाने गुवाहाटीला नातलगांकडे राहिलो. दोन रात्र तीन दिवसांसाठी त्यांनीच पूर्ण प्रवासासाठी गाडी, राहण्याची सोय केली होती. गुवाहाटीपासून शिलाँग १०० किलोमीटरवर. आमच्यासोबत झाडे-डोंगरही पळत होते. थोड्याच वेळांत अतिशय मोठा मानवनिर्मित स्वच्छ पाण्याचा तलाव पाहिला.

उमियम (बारापानी) तलाव. या तलावाला तीन-चार ठिकाणी देखावा पाहण्यासाठी (व्ह्यू पॉइंट) सोय आहे. चारी बाजूने हिरवाई, तलावात बोटिंग, पाण्यातले खेळ खेळले जातात. या पाण्यावर धरण बांधून जलविद्युतकेंद्र उभारले आहे. तलावाभोवती गाडीने फेरी मारणे हा एक सुखद अनुभव. पर्यटकांसाठी, कुटुंबासाठी आनंदायी विकसित असा हा उमियम तलाव. वाटेत मोकळ्या परिसरातील वाह काबा धबधबा पाहिला.

शिलाँग पर्यटनातील प्रसिद्ध स्थळ 'एलिफंट फॉल्स'. तीन स्तरीय धबधब्याचे सौंदर्य पायऱ्या असलेल्या पुलामुळे आम्ही सर्व बाजूने पाहिला. सुरुवातीलाच झाडामध्ये पहिला धबधबा जरा दुरूनच पाहिला. काही पायऱ्यांनंतर कठड्याजवळून दुसरा दिसतो. अंदाजे एकूण १०० पायऱ्या उतरल्यानंतर तिन्ही टप्यातले पाणी अखंड प्रवाहाने पायथ्याशी असलेल्या हत्तीच्या आकारासारख्या दगडावर पडून उडणारे तुषार अंगार अनुभवले. हा जलप्रपात जवळून पाहतो. आता दगडाचा आकार हत्तीसारखा राहिला नाही. पडलेल्या पाण्याचा जलाशय, तेथील मोठे मोठे दगड, पाण्यांत चालायला... मस्त.

मेघालय हे गुहा प्रणालीचे घर आहे. सर्वत्र धबधबे पाहताना चेरापुंजीच्या मार्गातील 'आरवाह गुहा' बघितली. येथे थोड्या पायऱ्या, थोडे सरळ असे अर्धा तास चालणे आहे. चुनखडी आणि जीवाष्मासाठी प्रसिद्ध असलेली ही एक विशाल गुहा आहे. आत प्रकाश आहे तरी टॉर्च असल्यास उत्तम. कारण पृष्ठभाग असमान, उंची कमी आहे तरी धोका नाही. सर्व वयोगटातील लोक जात होते.

ढगांच्या निवासस्थानातील सर्वात उंच असा 'नोहाकालिका धबधबा'. एका बाजूने लांबवर पसरलेला डोंगराचा पट्टा, वरती गर्द हिरव्या झाडामुळे पाण्याचा उगम दिसत नाही. दोन-तीन कडेकपारीतून पाणी खोलवर दरीत पडताना पाहत असताना, दुसरीकडे तिन्हीसांजेच्या सूर्यास्ताचेही आम्ही साक्षीदार झालो.

दुसऱ्या दिवशी स्फटिकासारखे पारदर्शक स्वच्छ पाण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मेघालयमधील डावकी नदीवर गेलो. पर्यटकांची बोटिंगसाठी प्रचंड गर्दी. सुरुवातीपेक्षा बोट जसजशी पुढे जाते तसे खरोखर पाण्याचा खालचा तळ स्पष्ट दिसतो. दोन्ही बाजूला प्रचंड मोठे दगड, त्यावर हिरवी झाडे, काही घरे, समोरच खासी आणि जैतिया पर्वतांना जोडणारा ब्रिटिशकाळांतील कर्षण सेतू. समोरून जाणाऱ्या गाड्या पाहत निसर्ग टिपून घेतला. अर्थजनासाठी हे ठिकाण तेजीत. नदीच्या पाण्याच्या बाहेर पसरलेल्या दगडातून एक रेघ भारत आणि बांगलादेशाला वेगळी करते. हीच भारत-बांगलादेशाची सीमा होय. भारतीय रक्षक आपल्याला तिकडे जाऊ नका असे सांगतात. या नदीमार्गे रोजगारासाठी ये-जा करणारे बांगलादेशी पाहिले. बांगलादेशीय भारतात येतात हे वाचलेले आठवले. डावकी आणि एशियातील सर्वात स्वच्छ गाव मावलयनॉन्ग ही दोन्ही गावे भारत-बांगलादेशच्या सीमेवर आहेत. डावकी नदी (उमंगोट) डावकी आणि मावलयनॉन्ग गावातून जैतिया आणि खासी पर्वतरांगांमधून पुढे बांगलादेशात जाते. डावकीच्या जवळ काही अंतरावर भारत आणि बांगलादेशाची सीमा पाहिली. तिथे आपल्या सरहद्दीत आपला आणि त्यांच्या सरहद्दीत त्यांचा ध्वज फडकत होता. आपला भारताचा तिरंगा पाहताना गलबलून आले. आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रासाठी 'सुतारकोडी' ही भारत-बांगलादेशाची आंतरराष्ट्रीय सीमा आहे. तेथे भारताचे प्रमुख चेक पोस्ट आहे. येथे अर्धा दिवस जातो.

मावलयनॉन्ग या स्वच्छ गावात थोडेचं फिरलो. त्याआधी एके ठिकाणी जिवंत झाडाच्या मुळापासून तयार झालेल्या ब्रीजवरून चाललो. निसर्गाची जादू अनुभवली. बाजूला पाण्याचा धबधबा. तेथे ट्रेकिंगसाठी जवानांची टूर आली होती.


तिसऱ्या दिवशी शिलाँगमध्ये असलेल्या काही चर्चपैकी सर्वात मोठे आणि प्रसिद्ध 'मेरीचे कॅथड्रेल चर्च' या शांत परिसरास भेट दिली. या चर्चची निळ्या रंगाची छटा (मेघालय नावाला साजेसा) लक्ष वेधून घेते. सकाळची वेळ व्यायाम, योगा, चालणे, ओपन जिम, मुलांसाठी खेळ अशा सर्वांसाठी विचारपूर्वक आखणी केलेले सुंदर 'वॉर्ड्स लेक'. येथे बोटिंग बंद आहे. पाण्यात छोटे मासे पाहिले. विविध प्रकारच्या वेगवेगळ्या रंगातील फुललेल्या फुलांनी सकाळ प्रसन्न केली. बागेचा आकार घोड्याच्या नालेसारखा. मध्यभागचा लाकडी पूल नजर खेचून घेतो.

शांत वातावरणातून खूप गर्दी, गजबजलेल्या भागाकडे गेलो. शिलाँगची प्रमुख बाजारपेठ, प्रमुख खरेदी केंद्र खाण्यासाठी हॉटेल्स, राहण्यासाठी होम स्टे, गेस्ट हाऊस, हॉटेल्स, सारे उपलब्ध असलेला 'पोलीस बाजार'. आम्ही येथे थोडा खाण्याचा स्वाद घेतला. ईशान्यकडील सात राज्यांच्या संस्कृतीचे पंरपरेचे प्रतीक असलेले सात मजली 'डॉन बास्को म्युझियम '. अतिशय अभ्यासपूर्ण, भव्य. सहज दोन तास लागतात. सर्वात वरती गोलाकार सुरक्षित टेरेसवरून (स्काय वॉक) फेरी मारताना परत पूर्ण शिलाँग पाहतो. जाता जाता शिलाँगचे सर्वोच्च शिखर 'शिलाँग पीक '. येथे भारताच्या हवाई दलाचे रडार स्टेशन असल्याने इतर वाहने ठरावीक अंतरानंतर आत येऊ शकत नाहीत. थोड्या अंतरासाठी टॅक्सीची सोय आहे. "आय लव्ह शिलाँग" ही खास फोटोची जागा. टेरेससारखा मोठा कॅरीडॉर, दोन्ही बाजूला निरीक्षण टॉवर. शिलाँगचे परत पूर्ण दर्शन! संपूर्ण शिलाँग प्रवासांत प्रत्येक ठिकाणी प्रवेश शुल्क आहे. सतत फिरताना फुलझाडांनी फुललेले झाड पाहताना घरात केर काढण्यासाठी वापरतो तो झाडू म्हणजे एका फुलझाडाच्या फांद्यांपासून बनवलेला! हा विचारच मनात शिवला नव्हता. असो.

**असे हे निसर्ग संपन्न आणि सुरक्षित शिलाँग!**

mbk1801@gmail.com

## थोर विचारवंत पांडुरंगशास्त्री आठवले...



कोकण आयकॉन



**सतीश पाटणकर**

योगेश्वर कृषी, वृक्षमंदिर, मत्स्यगंधा, घरमंदिर अशा एकापेक्षा एक विलक्षण सामाजिक उपक्रमांचे यशस्वी शिल्पकार, स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, तत्त्वज्ञान विद्यापीठाचे संस्थापक, थोर विचारवंत, तत्त्वचिंतक पांडुरंगशास्त्री वैजनाथशास्त्री आठवले यांचा जन्म कोकणातील रायगड जिल्ह्यातील 'रोहा' येथे वेदशास्त्रसंपन्न घराण्यात झाला. त्यांचे वडील रोहे येथे सरस्वती संस्कृत पाठशाळा चालवीत होते. या पाठशाळेत पांडुरंगशास्त्री यांचे वडिलांपाशीच प्रारंभिक शिक्षण झाले. दादांच्या आईचे नाव पार्वती होते. आजी सरस्वतीबाईंचा छोट्या पांडुरंगवर विशेष जीव होता. आजीचे निधन झाल्यानंतर वैजनाथशास्त्री रोह्याहून मुंबईस स्थलांतरित झाले. त्यांनी मुंबईच्या गिरगाव भागात माधवबाग येथे पाठशाळा सुरू केली आणि याच पाठशाळेत दादांचा भारतीय दर्शनशास्त्रे, वेदान्तासह भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला.

दादा एकपाठी होते. वाचनाची, अभ्यासाची उपजत आवड यामुळे अल्पकाळातच त्यांचा विद्याव्यासंग इतका दांडगा झाला की, अनेक थोर अभ्यासक थक्क होऊन जात. मराठी, संस्कृत, गुजराती, इंग्रजी, हिंदी अशा अनेक भाषांवर त्यांनी प्रभुत्व संपादन केले होते. वयाच्या केवळ बाविसाव्या वर्षी, १९४२ मध्ये त्यांनी वडिलांच्या आज्ञेने भगवद्गीतेवर पहिले प्रवचन दिले आणि त्यांच्या वाग्यज्ञाचा श्रीगणेशा झाला. त्यांनी एका नव्या दृष्टिकोनातून, नव्या समाजाला सहज पटेल, आवडेल अशा शब्दांत आपले विचार मांडले. भक्तीला सामाजिक शक्तीचे रूप दिले.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता, सलोख्याच्या हेतूने १९५४ साली जपान येथे झालेल्या जागतिक तत्त्वचिंतक परिषदेसाठी पांडुरंगशास्त्री यांना विशेष निमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी 'कृष्णम् वंदे जगद्गुरू' या विषयाद्वारे भारतीय अवतार कल्पनेवर आपले उदात्त, व्यापक विचार मांडून सर्वांना प्रभावित केले. त्यांची विद्वत्ता, मानव कल्याणाची उदात्त, व्यापक भूमिका आणि नवा दृष्टिकोन अमेरिकन तत्त्वचिंतकांना इतका भावला की, त्यांनी अमेरिकन नागरिकत्वाचा प्रस्ताव दादांपुढे ठेवला; पण दादांनी भारतभूमीत राहूनच कार्य करण्याचा आपला मनोदय ठामपणे व्यक्त केला.

१९५५ साली दादांनी 'स्वाध्याय परिवार' या कल्पनेला मूर्त रूप देण्याच्या दृष्टीने एकोणीस स्वाध्यायींना सौराष्ट्रात पाठविले आणि कार्यारंभ केला. 'भक्तिफेरी' असे या अभियानास नाव दिले गेले. आता या स्वाध्यायींची संख्या कित्येक लाख झालेली आहे. 'स्व'ला ओळखा, दुसऱ्यांच्या 'स्व'चा आदर करा, तेजाची पूजा करा, प्रेमभाव जपा, स्वतःला दुर्बल, शूद्र समजू नका, आपल्या हृदयस्थ देवत्वाला ओळखून आत्मगौरव संपादन करा, असे सांगत स्वाध्याय परिवाराचे हे कार्य दादांनी मराठी एवढेच गुजराती बांधवांमध्ये, तेही आदिवासी, कोळी या समाजामध्ये मोठ्या आत्मीयतेने रुजविले. त्यांनी महिन्यातील एक दिवस देवासाठी, समाजासाठी समर्पित भावाने कार्य करण्यास स्वाध्यायींना शिकविले व भक्तीला पूजापाठापलीकडे नेऊन सामाजिक कार्याचा आशय प्राप्त करून दिला. यातून 'योगेश्वर कृषी', 'मत्स्यगंधा' अशा उपक्रमांचा प्रारंभ झाला व ते अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाले. स्वाध्याय परिवाराचे कार्य पाहून खुद्द विनोबा भावे यांच्यासारखे भूदान चळवळीचे प्रणेतेही चकित झाले व त्यांनी स्वतःहून पांडुरंगशास्त्रींची भेट घेऊन स्वाध्याय परिवाराच्या कार्याचे सूत्र समजून घेतले. 'स्व'चा आत्मगौरव करीत परस्पर भेद, द्वेष विसरून प्रेमाने माणूस माणसाजवळ आणण्याचा स्वाध्याय हा एक बुद्धिगम्य मार्ग आहे, असे दादांनी त्यांना सांगितले. या दरम्यान पांडुरंगशास्त्री यांनी ठाणे येथे तत्त्वज्ञान विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाचे वेगळेपण लक्षात घेऊन भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ठाण्याला भेट देऊन तत्त्वज्ञान विद्यापीठाची पाहणी केली व दादांचे विशेष कौतुक केले.

दादांनी या विद्यापीठातील अभ्यासक्रमाच्या विदेशांतही शाखा उघडल्या. हिंदू धर्मासह ख्रिश्चन, इस्लाम, हिब्रू अशा विविध धर्मांचा निकोप दृष्टीने अभ्यास करून मग तुलनात्मकदृष्ट्या हिंदुधर्म विचार किती श्रेष्ठ, उदात्त, व्यापक आहे हे विदेशांतील विद्यार्थ्यांना स्वतःच्याच अभ्यासाद्वारे त्यांनी जाणवून दिले.

गुजरात, राजस्थानच्या सतत अवर्षणग्रस्त भागांत स्वाध्यायींनी तेथील गावकऱ्यांना बरोबर घेऊन श्रमदानाने ३०० तळी खोदली व पाण्याचा बिकट प्रश्न सोडविण्यात आपले कृतिशील योगदान दिले. तसेच माधववृंद आदी उपक्रमांद्वारे दरवर्षी लाखो झाडे लावून ती चांगली जगविण्याची दक्षताही घेतली.

१९८६ साली दादांनी उत्तर प्रदेशातील गंगा-यमुनेच्या संगमस्थळी, प्रयाग येथे 'तीर्थ मिलन' महामेळावा घेतला. या मेळाव्यास तीन लाख स्वाध्यायी सहभागी झाले होते. या मेळाव्याच्या सर्व व्यवस्था स्वाध्यायींनी स्वतः श्रमदानाने निर्माण केल्या होत्या, तर २००१ साली दादांच्या सहस्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने गुजरातमध्ये पंधरा लाख स्वाध्यायींचा महामेळावा झाला होता.

दादांची ग्रंथसंपदाही भारतीय विचारांचे, चिंतनाचे उदात्त दर्शन आहे. 'संस्कृती पूजन', 'दशावतार', 'वाल्मिकी रामायण', 'श्रीकृष्ण जीवनदर्शन', 'श्राद्ध' (भाग १-२), 'ऋषिस्मरण' इत्यादी अनेक विचारगर्भ पुस्तके लिहून दादांनी भारतीय ऋषिचिंतनाचे तेज व ओज दाखवून दिलेले आहे. दादांची वाङ्मय संपदा हे मराठीचे अक्षर वैभव आहे.

दादांनी भारत सोडून अन्यत्र अमेरिका, इंग्लंड या देशांत जाऊन स्थायिक होण्याचे नाकारले, यात त्यांची राष्ट्रनिष्ठा दिसते. तरीपण, त्यांनी अनेक देशांमध्ये स्वाध्याय परिवाराचे कार्य DAY-'डे' (Divine Association of Yogeshwar) अशी संस्था स्थापन करून विस्तारलेले आहे. अनेक देशांत त्यांच्या 'भक्तिफेरी'ने चांगलीच जागृती केलेली आहे. दादांचे कार्य पुरस्कारासाठी नाही, तरी त्यांच्या कार्याचा विविध संस्था, संघटनांनी राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे. 'महात्मा गांधी सेवा' पुरस्कार, 'लोकमान्य टिळक' राष्ट्रीय पुरस्कार यांबरोबरच त्यांना 'रेमन मॅगसेसे' पुरस्कारही मिळालेला आहे. 'मनुष्य ही ईश्वराची सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे, तिचा गौरव करा' या दादांच्या बोधामुळेच त्यांचा जन्मदिवस 'मनुष्य गौरव दिन' म्हणून स्वाध्यायी देशभर, विदेशांत साजरा करतात. २००३ मध्ये दिवाळीच्या प्रकाशोत्सवात लक्ष्मीपूजनाच्या दिनी दादांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. त्यांच्या कन्या सुश्री धनश्री तळवलकर या दादांचा वसा व वारसा पुढे चालवीत आहेत. स्वाध्याय परिवाराचे कार्य वर्धिष्णू होत आहे.

# बीडमधील स्वच्छता मोहिमेला गती

**स्वच्छता मोहिम** | **डॉ.योगेश क्षीरसागर फिल्डवर ;शिष्टमंडळाने घेतली होती मुख्याधिकाऱ्यांची भेट**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील आरोग्य व स्वच्छतेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची भेट घेऊन शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम गतीने राबवण्याची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने सोमवारपासून (दि.२६) शहरात स्वच्छता मोहीम गतिमान केली आहे.

शहरातील गटारी, रस्त्यांची सफाई, कचऱ्याची विल्हेवाट, पाण्याचे साचलेले ठिकाणे, डासनिर्मूलन अशा विविध बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. स्वच्छता मोहिमेच्या पहिल्याच दिवशी डॉ.योगेश क्षीरसागर स्वतः मोहिमेच्या ठिकाणी उपस्थित



राहिले. त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधत स्वच्छता कामकाजाची माहिती घेतली व यंत्रणेकडून नियोजनबद्ध पद्धतीने काम करून घेतले. यावेळी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, स्वच्छता विभागाचे अधिकारी व कर्मचारी, विविध भागातील माजी नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड शहरवासीयांचे सहकार्य महत्त्वाचे–डॉ.क्षीरसागर

या मोहिमेमुळे पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांना आळा घालण्यास मदत होणार असून, शहर स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी नागरिकांचेही सहकार्य मोलाचे आहे, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

### सतत देखरेख, आढावा घेतला जाणार

स्वच्छता मोहिमेचा नियमित आढावा घेण्यात येणार असून प्रत्येक वॉर्डातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेला अधिक प्रभावी करण्यासाठी नागरिकांच्या सूचना व सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे.

## नायगाव येथे रक्तदान शिबिर

धोरण:महामानवाच्या जयंती निमित्त उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील मौजे नायगाव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राहुल खोडसे यांनी संघर्ष युवा ग्रुपच्या माध्यमातून प्रतिवर्षी महामानवांच्या जयंती निमित्त विविध उपक्रम राबवत असतात.रक्तदान शिबिर आयोजित करतात.त्याच प्रमाणे याही वर्षी संघर्ष युवा ग्रुपच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या संयुक्त जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तब्बल २९ रक्तदात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपत आगळी वेगळी जयंती साजरी केली. यामध्ये तरुणांनी विशेष सहभाग नोंदवला होता.यावेळी राहुल खोडसे,सूरज खोडसे,प्रवीण खोडसे,उमेश खोडसे,सोमनाथ गुजर,अजय मुळूक, सुरेश खोडसे, ऋतुराज खोडसे,

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

नियोजन:वीरशैव लिंगायत समाजाकडून उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा व वीरशैव विकास प्रतिष्ठान व लिंगायत समाज परळी वतीने दहावी बारावी परीक्षेतील ५१ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला

संत गुरुलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे आज वीरशेव समाजातील ५१ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र वीरशैव सभेचे जिल्हाध्यक्ष दत्ताआप्पा इटके गुरुजी होते प्रमुख पाहुणे माजी नगराध्यक्ष सोमनाथ आप्पा हालगे वैद्यनाथ मंदिराचे विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे संत गुरुलिंग स्वामी मंदिराचे सेक्रेटरी ड गिरीश चौधरी वक्रेश्वर मंदिराचे विश्वस्त नारायण आप्पा खके दयानंद स्वामी सुभाष आप्पा भिंगोरे शिवकुमार व्यवहारे समर्थ शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव प्रभाकर इटके प्रकाश खोत यांची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी बोलताना दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी दहावी बारावी मध्ये चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले व डॉक्टर इंजिनियर वकील शिक्षक व्यापारी बनण्यासाठी व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनामध्ये यशस्वी झाल्याच्या नंतर आई–वडिलांना विसरू नये असे सांगितले यावेळी माजी नगराध्यक्ष सोमनाथ आप्पा हालगे यावेळेस बोलताना म्हणाले अभ्यासात सातत ठेवून पुढचं भविष्य उज्वल करा असे म्हणाले यावेळी इंजिनीयर निर्मळे साहेब व सचिन स्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना मोमेंटो प्रशस्तीपत्र पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक नावंदे गुरुजी यांनी केले यावेळी वीरशेव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम बुद्रे सचिव प्रा. सुधीर फुलारी सर महाराष्ट्र वीरशैव सभेचे तालुकाध्यक्ष महादेव इटके महाराष्ट्र वीरशेव सभा परळी शहराध्यक्ष नितीन समशेट्टी महाराष्ट्र वीरशेव सभेचे कार्याध्यक्ष रमेश चौडे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष शिवकुमार केदारी सहसचिव विकास हालगे वैजनाथ बँकेचे संचालक महेश्वर निर्मळे चंद्रकांत उदगीरकर सोमनाथ गोपनपाळे सर राजेश साखरे सर दत्तात्रेय गोपनपाळे लोकमतचे पत्रकार संजय खाकरे पत्रकार संतोष जुजगर शिवकुमार चौंडे तलाठी रमाकांत गुजर संजय कोरे नागेश फरकडी नागेश हाते राहुल निर्मळे नरेश पिंपळे बंडू चौंडे उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय स्वामी सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सोमनाथ गोपनपाळे सर यांनी केली या यावेळी समाजातील पुरुष महिला बहुसंख्य संख्येने उपस्थित होते

## शिवसेना शिंदे गटाची कार्यकारिणी!

निवड:तालुकाप्रमुख उध्दव मडके तर शहरप्रमुख मुकेश महाजन

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई: तालुका शिवसेना कार्यकारिणीच्या निवडी नुकत्याच झाल्या असुन यामध्ये गेवराई तालुका प्रमुखपदी उध्दव मडके तर शहरप्रमुख पदी मुकेश महाजन यांची निवड करण्यात आली आहे . गेवराई तालुक्यात मागिल अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या नव युवकांना शिवसेना पक्षात तालुक्यातील मुख्य पदे देवून खर्या अर्थाने शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी गेवराई तालुक्यातील शिवसैनिकांना न्याय दिला असल्याचे बोलले जात आहे.

तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या निवडी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार संजय मोरे शिवसेना सचिव यांनी निवडीचे पत्र काढले असुन मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते बीड येथे झालेल्या बैठकीत हे नियुक्ती



तलवाडा: मंत्री छगनराव भुजबळ यांची मुंबई येथील सांताक्रूझ निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा यथोचित सत्कार करताना महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष – बापू गाडेकर, उपाध्यक्ष गणेश काळे, तुकाराम लाड व अशोकराव ढाकणे आदी.

## कन्हेरवाडीत अभिष्टचिंतन सोहळा

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील कन्हेरवाडी येथील माजी सरपंच तथा विद्यमान ग्रा.प.सदस्य वसुदेव सावंत आणि शिक्षक मल्हारी गायकवाड यांचा दिनांक २५ मे रोजी संध्याकाळी त्यांच्या वाढदिवसानिमित्त लोकप्रतीनिधीसह ग्रामस्थांच्या वतीने शिवाजी चौक शिवनेरी हॉटेल येथे केक कापून त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करून त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला यावेळी श्री.शिवछत्रपती वाचनालयाचे संचालक प्रा.विलास जगताप सर, विवेकानंद मिटकरी सर,पत्रकार महेश मिटकरी,दयानंद जगताप,दत्तात्रय शिंदे,मधुकर सावंत सर यांनी माजी सरपंच वसुदेव सावंत यांच्या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले यावेळी निवृत्त मेजर अनंत कवडे,चेअरमन चंद्रकांत जाधव,माजी चेअरमन माणिकराव मिटकरी,येडेश्वरी देवस्थान येरमाळा ट्रस्टचे अध्यक्ष बापूराव बेंद्रे,पत्रकार रामराजे वमन (जगताप),प्रा.फुलचंद सावंत,अंगद आगलावे,विठ्ठल धोंगडे,विकास कवडे,अंगद कवडे, तानाजी सावंत,विजयकुमार सावंत व इतर ग्रामस्थांसह राजकीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बीडमध्ये साथी मोहिमेचा शुभारंभ

धोरण:राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरणाचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड येथे मा.न्या. आनंद यावलकर जिल्हा प्रमूख व सत्र न्यायाधिश बीड यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या साथी मोहिमेचा जिल्हयात शुभारंभ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्घाटक म्हणुन न्या. आर. जी. बागडे. प्रभारी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, तसेच जिल्हास्तरीय बैठकीला उपस्थित तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड, अशोक तांगडे, किरण नन्नावरे अधिकार मित्र बीड, दत्ता




बारगजे, शेळके पी.टी, संतोश गर्जे एनजिओ प्रतिनिधी, रंगनाथ राउत प्राथमिक शिक्षण आधिकारी, महेश त्रिंबकराव काकडे माध्यमिक शिक्षण आधिकारी आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण मार्फत देशातील दुर्लक्षित, बेघर, अनाथ किंवा रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वे क्षण करून त्यांना आधार नोंदणीव्दारे अधिकृत ओळख प्रदान करण्यासाठी साथी मोहिम सुरू करण्यात आली आहे.हि मोहिम दि. १३ मे ते १५ ऑगस्ट २०२५ या दरम्यान राबविण्यात येणार असुन मोहिमे दरम्यान केवळ मुलांची ओळख निर्माण न करता त्यांना शिक्षण, आरोग्य, निवारा, सामाजिक समावेश आणि कायदेशिर संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. ही मोहिम बालहित सर्वतोपरी या तत्वावर आधारित असुन बालकांचे ⏩ पान २ वर

## केज पंचायत समितीत गोंधळ!

चर्चा:ड्यूटी संपली तरीही ऑफिसमध्ये काय काम

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी डियुटी वर उशिरा येतात व नंतर उशीरा पर्यंत पंचायत समितीमध्ये थांबतात व नंतर लाचलुचपत काळाबाजार करतात असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण कुनाचे बिल काढण्यासाठी लाच घेताना निदर्शनास आले आहे मग पंचायत समितीच्या अधिकारी कर्मचारी यांना पगार कशासाठी दिला जातो डियुटीच्या वेळेत घरी बसतात व नंतर लाचलुचपत करण्यासाठी डियुटीचा टाईमींग संपला तरी केज पंचायत समिती मध्ये कुठे तरी कोपऱ्यात थांबतात असे



वागणे अधिकारी कर्मचारी यांनी बर नव्ह कारण अधिकारी कर्मचारी यांना किती लाच खायची यांचे भान राहीलेले नाही प्रत्येक विभागाचे अधिकारी दोन हजार तीन हजार घेतल्याशिवाय सही करत नाहीत केज ⏩ पान २ वर

**बोंबला** | **अधिकाऱ्यांची उडवा– उडवीची उत्तरे**

## पालिकेकडून मैला मिश्रित पाणी !

पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी:कॉलेज रोड परीसरात आठवडा भरापासून पिण्याच्या पाण्याच्या नलिकेतून शौचालयाचे मिश्रित पाणी पुरवठा होत असून त्याची तक्रार व निषेध व्यक्त करण्यासाठी पिडीत सर्व नागरिकांनी नगरपालिकेवर निषेध मोर्चाचा घेऊन गेले होते.रस्त्याच्या दुरुस्तीचे काम चालू असताना पिण्याच्या पाण्याची नलिका फुटली व त्यामध्ये शौचालयाचे पाणी घुसले.हा दूषित पाणीपुरवठा आठवडा भरापासून सुरू होता.

सुरुवातीला प्रमाण कमी असल्याने ही समस्या रहिवाशांना लक्षात आली नाही.परंतु पोटाच्या समस्या,आजारी पडण्याचे प्रमाण वाढल्याने व दूषित पाण्याचे प्रमाण वाढल्याने दुर्गंधी वाढली.



रस्त्याच्या दुरुस्तीचे काम नगरपालिकेमार्फतच चालू असून पाण्याची नलिका फुटल्यानंतर रहिवाशांना नगरपालिकेने कोणतीही सूचना दिली नाही.त्यामुळे सर्वांनी हे पाणी पिण्यास वापरले. फोन द्वारे संपर्क साधला असता उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली.प्रत्यक्ष नगरपालिकेत गेल्यानंतर श्री.कुमावत हे अधिकारी उपस्थित होते.त्यांना दूषित पाण्याचे सॅम्पल देण्यात आले.नलिका फुटल्याची व दूषित पाणी येत असल्याची पूर्वसूचना नागरिकांना का देण्यात आली नाही असा जाब विचारला असता त्यांनी यात नगरपालिकेचा दोष नसल्याचे बेजबाबदार उत्तर दिले.ही समस्या वारंवार होत असून पूर्वसूचना न दिल्याने अनेक नागरिकांच्या जीविताशी खेळ होत असल्याचे दुःख नागरिकांनी ⏩ पान २ वर

## खाजगी सावकारांना सुळसुळाट

नागरिक:प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: केज तालुक्यात खाजगी सावकारांना कुठल्याही प्रकारचा धाक राहिलेला नाही त्यामुळे केज तालुक्यात अनेक गोरगरीब जनतेला आत्महत्या करण्याची वेळ आली आहे केज तालुक्यातील प्रत्येक गावात एक प्रशासनाने शोध घेतला तर दोन – चार तरी खाजगी सावकार सापडतील व कार्यवाही करण्यासाठी सोपे पडेल व महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ कलम १८ अन्वये नुसार कार्यवाही करण्यासाठी सोपे ⏩ पान २ वर